cmyk

## संपादकीय

### दुर्दैव ! कूचकामी यंत्रणेवर विश्वास ठेवायचा कसा?

मुंबई पश्चिम रेल्वेच्या उपनगरी गाड्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या प्रकरणात उच्च न्यायालयाकडून १२ आरोपींची झालेली निर्दोष मुक्तता धक्कादायकच म्हटली पाहिजे. या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या एटीएसबरोबरच महाराष्ट्र सरकारसाठीदेखील ही नामुष्कीच असून, यातून यंत्रणांच्या तपासाबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण होते. साधारण १९ वर्षांपूर्वी लोकलच्या प्रथमश्रेणी डब्यात एकामागोमाग एक बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–८९ | गुरूवार, दि.२४ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### अल–कायदाशी संबंधित ४ दहशतवाद्यांना अटक

अहमदाबाद : गुजरात एटीएसने अल–कायदाशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. हे चौघेही ब–याच काळापासून सक्रिय होते. एटीएसला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे चौघांच्या मुसक्या आवळण्यात आल्या. दोघांना गुजरातमधून, एका दिल्लीतून आणि एका दहशतवाद्याला नोएडामधून अटक करण्यात असून सध्या त्यांची कसून चौकशी केली जात आहे. एटीएसचे डीआयजी सुनील जोश यांनी याबाबत माहिती दिली. गुजरात एटीएसने पकडलेल्या चार दहशतवाद्यांबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. एटीएसच्या मते, चौघेही अल–कायदाचे मॉड्यूल एक्यूआयएसशी संबंधित होते.

## थोडक्यात...

### दादांनी कोकाटेंचे खाते बदलावे–रोहित पवार

मुंबई–माणिकराव कोकाटे सातत्याने शेतकऱ्यांविरोधात विधाने करतात. अजित पवार यांनी कोकाटेंचे खात बदलावे, नाहीतर स्वत:च त्या विभागाची जबाबदारी घ्यावी, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे.

### अजितदादा–तटकरे यांच्यात शनिवारी बैठक

मुंबई–शनिवारी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि अजित पवार यांच्यात महत्वाची बैठक होणार आहे. माणिकराव कोकाटे यांचे विधान, लातूरमधील मारहाण प्रकरण, सुनील तटकरे यांनी केलेला दौरा आणि पक्षाची सध्याची स्थिती यावर चर्चा होणार आहे. माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल बैठकीत काही निर्णय होण्याची शक्यता आहे.

### कोकाटेंवर अजित पवार भूमिका घेतील– तटकरे

मुंबई–माणिकराव कोकाटे यांच्या विषयावर मी एकदा बोललो आहे. अधिक बोलणं उचित वाटत नाही. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार या संदर्भातील पुढील भूमिका घेतील असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले.

### फरार सूरज चव्हाणला जामीन

लातूर : शेतकरी संघटनेचे पदाधिकारी विजयकुमार घाडगे यांना झालेल्या मारहाण प्रकरणातील अकरा फरार आरोपींपैकी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सूरज चव्हाण फरार होते. मारहाण प्रकरणानंतर फरार असलेले सूरज चव्हाण पोलिसांना शरण आले आहेत. सूरज चव्हाणसह १० जण पोलिसांच्या ताब्यात होते. सूरज चव्हाण रात्री पोलिस ठाण्यात हजर झाले. त्यानंतर पहाटेच्या सुमारास त्यांना जामीनही मंजूर झाला आहे.

## सिंचनाचे क्षेत्र वाढणार; नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून वैतरणा धरणातून होणार विसर्ग

# मराठवाड्याला मिळणार हक्काचे १६.५० टीएमसी पाणी

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

सततच्या दुष्काळाशी सामना करणाऱ्या मराठवाड्यासाठी एक दिलासा देणारी बातमी आहे. गेल्या अनेक वर्षापासूनच्या मागणीला यश आले असून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी आता लवकरच मिळणार आहे. नाशिक जिल्ह्यातील वैतरणा धरणातून मराठवाड्याला १६.५० टीएमसी पाणी मिळणार आहे. हे पाणी मराठवाड्याला मिळाले तर शेकडो एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे



#### नदीजोडच्या माध्यमातून सर्व धरणे जोडणे आवश्यक

मराठवाड्याला १६.५० टीएमसी पाणी जरी मिळणार असले तरी जायकवाडीचे पाणी हे मराठवाड्यातील इतर मोठ्या धरणात नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जाणे आवश्यक आहे. तसेच ज्या धरणात जायकवाडीचे पाणी येईल त्या धरणातून मराठवाड्यातील छोट्या–मोठ्या तलावात ते पाणी आले तर मराठवाडा हा सुजलाम् सुफलाम् होण्यास मदत होईल.

यासाठी स्व. गोपीनाथ मुंडे यांच्यासह मराठवाड्यातील बऱ्याच लोकप्रतिनिधींनी संभाजीनगर येथे आंदोलने केली. मात्र त्यावेळी त्यांच्या आंदोलनाला यश आले नाही. सध्या महाराष्ट्रात नदीजोड प्रकल्प फडणवीस सरकारने हाती घेतला असून बऱ्याच भागात याचे काम सुरु आहे. नाशिक जिल्ह्यातील घारगाव–इगतपुरी येथील ऊर्ध्व वैतरणा धरणातील अतिरिक्त १६.५० टीएमसी पाणी पुढील वर्षी मराठवाड्याला मिळणार आहे. जलसंपदा विभागाच्या ▶▶ पान २ वर

## महादेव मुंडेंचा गळा कापला, शरीरावर १६ घाव

### शवविच्छेदन अहवालातून क्रूरता आली समोर

बीड । प्रतिनिधी

परळीमधील महादेव मुंडेंची सरपंच संतोष देशमुख यांच्याप्रमाणेच क्रूर हत्या केल्याचे समोर आले आहे. शवविच्छेदन अहवालातून क्रूरता समोर आली आहे. महादेव मुंडे यांची २० महिन्यांपूर्वी परळीत निर्घृण हत्या झाली होती. त्यांची श्वसननलिका कापली होती. मुख्य रक्तवाहिन्या देखील खोलवर झालेल्या वारामध्ये कापल्या होत्या. मानेवर, हातावर, तोंडावर आणि इतर ठिकाणी एकूण १६ वार करण्यात आले होते. चेहरा, छाती, दोन्ही हात आणि शरीराचा इतर भाग रक्ताने माखलेला होता.



मात्र याप्रकरणात एकाही आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नाही. या हत्याकांडातील आरोपी कोण याचाच ▶▶ पान २ वर

#### शेवटपर्यंत जीव वाचवण्याचा प्रयत्न

महादेव मुंडे यांच्या शरीरावरील वाराने आरोपींची क्रूरता स्पष्ट होते. या मारहाणीमुळे महादेव मुंडे यांच्या शरीरातून अतिरक्तस्त्राव झाला. श्वसननलिका कापली, रक्तवाहिन्या तुटल्या. डाव्या व उजव्या हाताला अंगठ्याजवळ, तळहातावर, मधल्या बोटाजवळ वार झाल्याचे अहवालात समोर आले आहे. खाली पडल्याने डावा गुडघा खरचटलेला आहे. महादेव मुंडेंनी शेवटपर्यंत जीव वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

## नियमबाह्यरित्या स्थलांतरित झालेल्या शाळा बंद करणार

### •शिक्षणाधिकारी भगवान फुलारी •

बीड । प्रतिनिधी

बीड शहरासह जिल्ह्यामध्ये काही शहरांमध्ये नियमबाह्यरित्या स्थलांतरित झालेल्या शाळा सुरू आहेत. यामध्ये काही माध्यमिक तर काही प्राथमिक शाळांचा समावेश आहे. बीडमध्ये सद्यस्थितीमध्ये पाच शाळा या नियमबाह्यरित्या स्थलांतरित करून सुरू आहेत. या शाळा तात्काळ बंद करण्याचे आदेश प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दिले आहेत.

बीड शहरांमध्ये सध्या बालेपिर तसेच इतर भागांमध्ये जवळपास पाच शाळा या नियमबाह्यरित्या स्थलांतरित करण्यात आले आहेत. बालपिर परिसरामध्ये नूर उर्दू हायस्कूल आणि जिजामाता विद्यालय या शाळा नियमबाह्यरित्या स्थलांतरित करण्यात आले आहेत. उर्दू हायस्कूल ही शाळा झमझम कॉलनी येथील मान्यता प्राप्त असताना ही शाळा निमबाहेरीत्या स्थलांतरित करून ती बालपिर परिसरात भरवण्यात येत आहे. बीड शहरासह जिल्ह्यामधील काही शहरांमध्ये सुद्धा नियमबाह्यरित्या स्थलांतरित करण्यात आलेल्या शाळा सुरू असल्याचे समजते. त्यामुळे अशा शाळा शोधून त्या बंद करण्यात याव्यात असे आदेश प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी संबंधितांना दिले आहेत.

## बंदुकीचा धाक दाखवत पीएसआयकडून बलात्कार

बीड । प्रतिनिधी

एका विवाहीत महिलेसोबत असलेल्या ओळखीचा फायदा घेत घरात घुसून बंदूकिचा धाक दाखवत बलात्कार केल्याची घटना शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी एपीआय असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहत असलेल्या एका ३९ वर्षीय पिडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, घरा शेजारी राहणाऱ्या तरूणासोबत ओळख झाली होती. मात्र २००७ मध्ये माझे लग्न झाल्यानंतर सासरी गेले. त्यानंतर काही कारणामुळे बीडमध्ये राहण्यासाठी आल्यानंतर संबंधित तरूण पुन्हा माझ्याशी संपर्क करून घरी येण्याचा प्रयत्न करू लागला. २०११ मध्ये सदरील ▶▶ पान २ वर

## जामीन मिळताच प्रोफेशनलचे गलीच्छ व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

बीड । प्रतिनिधी

येथील उमाकिरण शैक्षणिक संकुलनामध्ये विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी अटकेत असलेले प्रोफेशनल कोचिंग क्लासेस चे विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना काल जामीन मिळताच सोशल मीडियावर मात्र त्यांच्या कृष्णकृत्याचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत व्हिडिओ पाहून अनेकांनी रोष व्यक्त केला आहे या प्रकरणाची सध्या एसआयटी मार्फत




चौकशी सुरू असून पुरवणी अहवालामध्ये हे सर्व आल्यास पुन्हा अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

उमा किरण शैक्षणिक संकुल मध्ये विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी विजय पवार आणि प्रशांत खटोकर या दोघाविरुद्ध पोस्को गुन्ह्यात अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता या प्रकरणात त्यांना अटक झाल्यानंतर पुन्हा एका विद्यार्थिनीचा छळ केल्याप्रकरणी ॲट्रॉसिटी ॲक्ट सह विनयभंगाचा शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा ▶▶ पान २ वर

## अडीच हजाराची लाच घेताना आष्टीत मंडळ अधिकारी पकडला

बीड । प्रतिनिधी

खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार ला नोंद करून देण्यासाठी प्रत्येक कामाचे दीड हजार रुपये प्रमाणे ३००० रुपयाची मागणी करत पंचा समक्ष तक्रारदाराकडून अडीच हजार स्वीकारताना डोईठाण तालुका आष्टी सध्याचे ग्राम महसूल अधिकारी अशोक रघुनाथ सुडके व बापूराव रावसाहेब क्षीरसागर या दोघांना लाच लचपत प्रतिबंधक



विभागाच्या पथकाने आज सापळा रचून पकडले.

यातील तक्रारदाराने रीतसर तक्रार दिली त्याच्या वडिलांच्या नावे असलेल्या जमिनीवरील बोजा सातबारा वरून कमी करण्यासाठी व तक्रार देणे स्वत:च्या नावे खरेदी केलेली जमिनीची फेरफारला नोंद करण्यासाठी मंडळ अधिकारी यांनी प्रत्येक कामाचे दीड हजार रुपये लाचेची मागणी केली होती अशा स्वरूपाची तक्रार एसीबी कडे झाल्यानंतर एसीबीने आष्टी येथे जाऊन तक्रारदार व पंच यांच्या समक्ष राष्ट्रीय येतील तलाठी ▶▶ पान २ वर

## राजुरीत गावठी कट्ट्यासह तरुण पकडला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये खेळणीतील बंदुकीप्रमाणे गावठी कट्टे आणि घातक शस्त्र तरुणांच्या हातामध्ये दिसत आहेत मागील आठ दिवसांपूर्वीच पालवन चौकातील एकाला गावठी कट्ट्यासह पकडल्यानंतर आज पुन्हा नवगण राजुरी येथील एका २७ वर्षे तरुणाला गावठी कट्ट्यासह एलसीबीच्या पथकाने पकडले.

पोलीस अधीक्षक बीड यांनी जिल्हयामधील अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केल्याने स्थानिक गुन्हे शाखेला दिनांक २३.०७.२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की नवगन राजुरी ता.जि.बीड येथे बस स्थानक परीसरात असलेल्या विना नावाचे टपरी मध्ये गुलाबी रंगाचे टि शर्ट व काळी जिन्स्? पॅन्ट्? घातलेल्या ईसमांनी त्याचे




पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा खवलेला आहे. सदरील बातमी वरून पथकाने नवगण राजुरी येथे जावुन सदरील ▶▶ पान २ वर

### गडकरींना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

पुणे । प्रतिनिधी

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्ट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करणार आहे. ऑगस्ट १ रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त



हा पुरस्कार देण्यात येईल. गडकरी यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येत आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) ▶▶ पान २ वर

## नशेच्या गोळ्या विक्री प्रकरण मेडिकल चालकासह दोघांना अटक



बीड । प्रतिनिधी

नशेसाठी गोळया व औषधांची विक्री करणाऱ्या दोन जणांना बीड शहर पोलिसांनी तपसात अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मेडिकल चालक व त्याला पुरवठा करणारा तरुण यांचा समावेश आहे.

पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी नशाखोरी आणि त्यापाठीमागील गुन्हेगार यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. बीड शहर पोलिसांनी दोन महिन्यांपूर्वी नशेच्या गोळ्या विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. या प्रकरणात चार जणांना तेव्हा अटक केली होती. त्यांच्याकडून अल्फ्राझोलम गोळ्या आणि कोडीन सायरपसह एकूण सुमारे साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा नोंद केला होता. सध्या हे चारही आरोपी कारागृहात आहेत. या प्रकरणाच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१.०० क्विंटल | २,४५१ | २,७२८ | २,५६८ |
| ज्वारी/हायब्रिड : ९३.५० क्विंटल | १,९५० | ३,०७० | २,४९३ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,३०० | ६,५०० | ६,४२६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७१.५० क्विंटल | २,११० | २,८५८ | २,६३४ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २५.०० क्विंटल | ३,९०० | ३,९०० | ३,९०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,६०० | ५,१११ | ४,८५५ |

### शिंदेंच्या खात्यावर फडणवीसांचा लगाम

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकार स्थापन झाल्यापासूनच सरकारमधील तिन्ही घटक पक्षांमध्ये अंतर्गत वाद आणि कुरघोड्यांचे राजकारण काही लपून राहिलेले नाही. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयानुसार, नगरविकास विभागातील मोठ्या निधीवाटपासाठी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ▶▶ पान २ वर

## गाभाऱ्याला टेकू, शीळांना तडे; तुळजाभवानी मंदिराचं मुख्य शिखर खाली उतरवणार?

तुळजापुर । प्रतिनिधी

तुळजाभवानी मंदिरात देवीच्या गाभाऱ्यात शीळांना तडे गेले आहेत. गाभाऱ्याला बीमचा तात्पुरता आधार देण्यात आलाय. आता मुख्य शिखराला अधिक धोका आहे.

श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याला धोका निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आता मंदिराचे मुख्य शिखर खाली उतरवावे लागणार का? असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.





मंदिरातील जुन्या दगडी शिळांना मोठे तडे गेल्यामुळे गाभारा आणि शिखराला धोका असल्याचे राज्य पुरातत्त्व विभागाच्या पाहणीत समोर आले आहे. त्यामुळे मंदिर प्रशासन, पुरातत्त्व विभाग आणि भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. तुळजाभवानी मंदिर हे राज्यातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत आहे. सध्या देवीच्या गाभाऱ्याला लोखंडी बीमचा तात्पुरता आधार देण्यात आला असून, मुख्य शिखरात धोका अधिक वाढल्याने राज्य पुरातत्त्व विभागाने शिखर उतरवण्याबाबत प्राथमिक अहवाल दिला आहे. दरम्यान, केंद्रीय पुरातत्त्व विभागाने आतापर्यंत दोन स्वतंत्र अहवाल सादर केले असून, ▶▶ पान २ वर

## मकरंद पाटील असणार नवे कृषीमंत्री?

मुंबई । प्रतिनिधी

माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषी खातं काढून घेण्याची शक्यता आहे. मकरंद पाटील यांना हे खातं सोपवण्यात येऊ शकते, तर कोकाटे यांना मदत व पुनर्वसन खाते मिळू शकते. कोकाटे यांच्यावरून पक्षातील नाराजी व्यक्त होत असली तरी, त्यांचे मंत्रीपद ताबडतोब रद्द करणार नाहीत असे सूत्रांनी सांगितले आहे.

राज्यातील शेतकऱ्यांबद्दल असंवेदनशील वक्तव्य करणे, राज्यात बळीराजा जीव देत असताना सभागृहात बसून मोबाईलवर ऑनलाइन रमी (पत्ते) खेळणे अशा विविध आरोपांमुळे चर्चेत असलेले राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषी खाते काढून घेतले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एवढेच नव्हे तर मकरंद पाटील यांच्याकडे कृषी ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दुर्दैव ! कूचकामी यंत्रणेवर विश्वास ठेवायचा कसा?

मुंबई पश्चिम रेल्वेच्या उपनगरी गाड्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या प्रकरणात उच्च न्यायालयाकडून १२ आरोपींची झालेली निर्दोष मुक्तता धक्कादायकच म्हटली पाहिजे. या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या एटीएसबरोबरच महाराष्ट्र सरकारसाठीदेखील ही नामुष्कीच असून, यातून यंत्रणांच्या तपासाबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण होते. साधारण १९ वर्षांपूर्वी लोकलच्या प्रथमश्रेणी डब्यात एकामागोमाग एक बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले. या स्फोटांमध्ये तब्बल १८९ प्रवाशांचा मृत्यू, तर ८१७ प्रवासी गंभीर जखमी झाले.


या बॉम्बस्फोटाने झालेल्या जखमा अजूनही मिटलेल्या नसताना हा निकाल आल्यामुळे मृतांच्या नातलगांची तसेच अपंगत्व पत्करावे लागलेल्या पीडितांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पनाच केलेली बरी. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. येथील लोकलसेवा ही या महानगरीची जीवनवाहिनी. पोटापाण्यासाठी लाखो लोक मुंबई लोकलच्या या गर्दीत स्वत:ला अक्षरश: झोकून देतात. हेच हेरून मुंबई लोकलला दहशतवाद्यांकडून लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यात शेकडो लोक मारले जातात, त्यात रेल्वेचेही ८५ लाख ६१ हजार ऊपयांचे नुकसान होते, तरीही यामागचे नेमके गुन्हेगार सापडत नाही, ही शोकांतिकाच म्हणायला हवी. सर्व आरोपी सिमी संघटनेचे सदस्य असून, त्यांनी पाकस्थित लष्कर ए तोयबा या संघटनेच्या मदतीने हे स्फोट घडवून आणल्याचा दावा एटीएसने केला होता. याप्रकरणी विशेष न्यायालयाने २०१५ मध्ये बारा जणांना दोषी ठरवत पाच जणांना फाशी, तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षाही सुनावली होती. परंतु, उच्च न्यायालयात हा निकाल का टिकू शकला नाही. म्हणूनच याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. मुख्य म्हणजे निर्णय देताना न्यायालयाकडून ओढण्यात आलेले ताशेरे एकूणच तपासातील त्रुटीवरच प्रकाश टाकतात. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ व आरोपींकडून जप्त करण्यात आलेले साहित्य आणि कबुलीजबाब या तिन्ही पातळ्यांवर आरोपींविरोधात एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणांना यश आले नसल्यावर न्यायालयाने बोट ठेवले आहे. साक्षीदारांची साक्ष नोंदवताना अनेक तांत्रिक चुका झाल्या आहेत. घटनेनंतर अनेक वर्षांनी त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले आहे. ते गंभीरच म्हटले पाहिजे. वास्तविक तपास हाती घेतल्यानंतर लवकरात लवकर जबाब नोंदवणे अपेक्षित असते. परंतु, त्याकरिता वर्षानुवर्षे लावली जात असतील, तर तपास यंत्रणांचा कारभार किती दिरंगाईने चालतो, हेच अधोरेखित होते. पोलिसांच्या आरोपांना समर्थन करणाऱ्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नाही. उलट सर्व आरोपींचा छळ करून त्यांच्याकडून कबुलीजबाब नोंदविण्यात आल्याचे न्यायालय म्हणते. कोणत्याही गुन्ह्याच्या वा घटनेच्या तपासात कबुलीजबाब अत्यंत महत्त्वाचा असतो. या कबुलीजबाबाची एक पद्धत असते. त्यामध्ये सुसंगतीही असावी लागते. तथापि, तोच अविश्वसनीय वाटत असेल, तर कुठेतरी त्रुटी राहिली, असे म्हणावयास जागा आहे. या प्रकरणात आरोपींची ओळख पटविण्यास प्रचंड विलंब झाला. त्याचे कारणही तपास यंत्रणांकडून देण्यात आले आहे. त्यावरूनही न्यायालयाने एटीएसला धारेवर धरलेले दिसते. अशा घटनांमध्ये स्फोटके, नकाशे, बंदुका हे पुरावे महत्त्वाचे असतीलही. पण, ते पुरेसे ठरतीलच, असे नाही. मूळ म्हणजे या स्फोटासाठी कोणती स्फोटके वापरण्यात आली, त्याबाबतही योग्य ती माहिती पुरवण्यास तपास यंत्रणा अपयशी ठरत असेल, तर त्यांची कीवच करायला हवी. बॉम्बस्फोटाची स्फोटके, जप्त केलेले सर्किट बॉक्स एवढेही साधे या यंत्रणांना जतन करता येत नाही. हे म्हणजे अतिच झाले. न्यायालयाची ही सगळी निरीक्षणे बघता एकूणच या तपासामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी राहिल्या आहेत, हे मान्य करावे लागते. गुन्ह्याचा तपास करणे आणि तपास केल्याचा आभास करणे, या दोन स्वतंत्र बाबी आहेत. तपास यंत्रणांनी आभास निर्माण केला, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. असा आभासी तपास हे काही चांगले लक्षण म्हणता येणार नाही. आता या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात लवकरात लवकर अपील दाखल करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा निर्णय आमच्याकरिता नक्कीच धक्कादायक आहे, असे सांगतानाच त्यांनी आपली पुढची दिशाही स्पष्ट केली आहे. खरे तर सत्र न्यायालयातील पुरावे उच्च न्यायालयात टिकायला हवेत. ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम म्हणतात, त्याप्रमाणे यात नक्की कोणाचा दोष आहे, कायद्याचे विश्लेषण किंवा पुरावे सादर करण्यात काही चूक झाली का, हे पहावे लागेल. अनेकदा उच्च न्यायालयातील निकाल हे सर्वोच्च न्यायालयात कायम होत असतात. याचा अनुभव लक्षात घेता या खटल्याबाबतच निश्चितच अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या अर्थी राज्य सरकार व एटीएसवर मोठी जबाबदारी असेल. तपासामध्ये ज्या पद्धतीने त्रुटी ठेवण्यात आल्या, त्या त्रुटी सर्वप्रथम दूर करणे क्रमप्राप्त असेल. हे आव्हान तपास यंत्रणा कशा स्वीकारतात, हे पाहिले पाहिजे. मुंबई व मुंबईकरांना आजपर्यंत दहशतवादाचे अनेकदा चटके सोसावे लागले आहेत. मग ते १९९३ चे बॉम्बस्फोट असोत, २६/११ चा दहशतवादी हल्ला असो किंवा २००६ चे हे साखळी स्फोट असोत. परंतु, इतके सारे होऊनही या गुन्ह्यातील आरोपी निर्दोष सुटत असतील किंवा या गुन्ह्याच्या सूत्रधारांविरोधात पुरावे गोळा करण्यात आपल्याला अपयश येत असेल, तर एकूणच तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेबद्दलच प्रश्न उपस्थित होतात. दहशतवादी अलीकडे दहशतवादी कारवायांकरिता तंत्रज्ञानाचा मोठा वापर करतात. त्यांना ठेचायचे असेल, तर सर्वच बाबतीत त्यांच्या दोन पावले पुढे रहायला पाहिजे. हे यंत्रणांनी लक्षात घ्यावे.

# बीड जिल्हाधिकारी दालनात आ.क्षीरसागर यांची बैठक

## शहर आणि ग्रामीणमधील पाणीपुरवठा, रस्ते, जमीन संपादनाच्या मुद्यांवर सविस्तर चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या दालनात बुधवार (दि.२३) रोजु आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहर आणि ग्रामीण भागातील विकासकामांबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. यावेळी अमृत पाणीपुरवठा, रस्ते विकास, जमीन संपादन आणि जलजीवन मिशनच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम उपस्थित होते.**



बीड शहरातील अमृत पाणीपुरवठा योजनेची कामे कंत्राटदाराच्या ढिसाळ कारभारामुळे रखडली आहेत. यावर उपाय म्हणून मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगर परिषद आणि कंत्राटदार यांची जिल्हाधिकारी यांच्या दालनात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे ठरवले. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर रोडवरील नवीन सिमेंट रस्ता व दुभाजक झाले आहे. हे दुभाजक होत असताना जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर वाहनांसाठी रस्ता क्रॉसिंग असणे आवश्यक आहे. याबाबत चर्चा केली. राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एफ वरील खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या; पण अनेकांना अद्यापपर्यंत मावेजा मिळालेला नाही. त्याबाबतीत मुळ दुरूस्ती, सुधारित निवाडा संबंधी वेळोवळी विभागाला मागणी प्रस्तावित केलेली आहे. याबाबतीत जमीन संपादीत होऊनही आतोनात हाल झाले आहेत. यावर आ.क्षीरसागर यांनी सविस्तर चर्चा केली. बीड आणि शिरूर तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट आणि अपूर्ण असल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. आ. क्षीरसागर यांनी गावनिहाय तक्रारी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

# बीड शहरातील वीर सावरकर प्रतिष्ठान, कल्पतरू परिवाराकडून लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

**थोर क्रांतिकारक, पत्रकार, समाजसुधारक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.**



या कार्यक्रमात कल्पतरूचे सचिव डॉ. सारीका क्षीरसागर, पूर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, संचालक डॉ. आनंद वैद्य, वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य पांडव, डॉ. पी. के. कुलकर्णी, शुभम जोशी, प्रा. नितेश अग्रवाल, ऋतुपर्ण रामदासी, डॉ. गणेश आडगावकर, सतीश देशपांडे, त्रिंबक देशपांडे, ॲड. जितेंद्र पांडव, संतोष चिंचोलकर, प्रा. मिलिंद शिवनिकर, गणेश महाराज देशमुख, ॲड. अमित हसेगावकर, महेश कुलकर्णी, प्रा. शशिकांत पसारकर, नितीन जोशी, हर्षद आडगावकर, प्रा. कृष्णा रामदासी, गणेश तालखेडकर, किशोर खडकीकर, डॉ. ऋखमिनीकांत पांडव, प्रतीक सांगडे, प्रसाद थिगळे, रामकाका कुलकर्णी, अनिल जोशी, रोहित उमापूरकर, हेमंत जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, लोकमान्य टिळकांनी दिलेल्या 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या प्रेरणादायी विचाराच्या स्मरणाने या कार्यक्रमात उपस्थितांनी राष्ट्रनिर्माण व सामाजिक कार्यासाठी कार्य करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे संयोजन वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठान व कल्पतरू परिवारातर्फे करण्यात आले होते.

# बालेपीर मध्ये अपेक्स रुग्णलायचे उदघाटन थाटात



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बालेपीर भागातील अजमेर नगर येथे शुक्रवारी सायंकाळी डॉ. मोमीन नोमान शकील अहेमद ( बीएचएमएस, जनरल फिजिशियन) यांच्या अपेक्स दवाखान्याचे उदघाटन करण्यात आले. हा उदघाटन समारंभ डॉ. शेख नासेर साहब (वरिष्ठ प्रा. एसकेएच, मेडिकल कॉलेज, बीड.), मोमीन अयाज अब्दुल करीम (एमबीआर अर्थमुव्हर्स), हाफिज मोईनोद्दिन साहब (शहर-ए-काजी), मोमीन मोहसीन साहब (नगर सेवक बालेपीर), शेख मजीद साहब (सबा ऑप्टीकल) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

प्रारंभी डॉ. मोमीन नोमान यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे यथोचित स्वागत केले. या उदघाटन कार्यक्रमास .डॉ. शेख़ मुबारक,डॉ शेख़ अज़ीज़,डॉ अमोल, ,पठान अमरजान, शेख़ समीर,डॉ शेख़ मनसूर,डॉ गणेश बिराजदार,डॉ शेख़ रिजवान,डी बी शेख,सद्दाम शेख,सूफियान,पठान साजिद, मौलाना सलीम शेख, शेख़ मोइन,मोमिन अनीस, सय्यद हुसैन,विठ्ठल घाडगे,मोमिन वाजेद,सय्यद अकरम,शेख़ रईस,मोमिन अमीन,मोमिन शोएब, मोमिन सुहेल,आदिसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अपेक्स दवाखान्याच्या माध्यमातुन गोरगरीब व सर्व सामान्य रुग्णांची माफक दरात सेवा करायची ईच्छा त्यांनी बोलून दाखविली.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढायच्या अन् जिंकायच्या-डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्रामने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. दि. २३ जुलै रोजी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी सर्कल निहाय आढावा बैठका घेतल्या यात त्यांनी सर्कल , गण निहाय प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याशी चर्चा करत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांने कामाला लागण्याच्या सूचना दिल्या.**



येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. काल शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून सर्कल निहाय आढावा घेतला. या बैठकीसाठी सर्कल तसेच पंचायत समिती गण व विविध गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर विश्वास ठेवत मतदारांनी चार जिल्हापरिषद आणि तीन पंचायत समिती सदस्य निवडून दिले होते .परंतु या निवडणुकीत दुर्दैवाने साहेब आपल्या नाहीत त्यांच्या पश्चात आपल्याला आपल्या विचारांचे लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेत पाठवावे लागतील यासाठी सर्वांनी निवडणुकीच्या तयारीला लागा शिवसंग्राम या निवडणुका संपूर्ण ताकतीनिशी लढणार आहे. युती होईल अथवा आघाडी होईल याची कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारची चिंता करण्याचे कारण नाही. स्थानिक पातळीवर योग्य तो निर्णय घेतला जाईल जे सोबत येतील त्यांच्या सोबत किंवा त्यांच्या शिवाय ही निवडणूक लढवली जाईल मात्र ही निवडणूक लढायची अन्? जिंकायची प्रतिज्ञा करून आपण काम करा यश नक्की आपले असेल असे प्रतिपादन यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केले तसेच येणाऱ्या काळात निवडणुकीला कशाप्रकारे सामोरे जायचे या संदर्भात शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले आणि निवडणुकीच्या तयारीला लागा असे मूलमंत्र दिले. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे , जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव,जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष पंडित माने , मनिषा कुपकर, राजेंद्र आमटे आदी सह प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### मराठवाड्याला मिळणार हक्काचे

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. हे १६.५० टीएमसी पाणी वैतरणा धरणातून मुकणे धरणाद्वारे मराठवाड्याला उपलब्ध करून दिले जाईल. नदी जोड प्रकल्पांतर्गत हे पाणी गोदावरी नदीतून जायकवाडी प्रकल्पात पोहोचेल. हे पाणी आले तर मराठवाड्यातील शेकडो एकर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची शक्यता आहे.

-----------

### महादेव मुंडेंचा गळा कापला,

पोलिस १८ महिने उलटूनही शोध घेत आहेत.परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणाचा शवविच्छेदन रिपोर्ट हाती लागला असून यात अंगावर काटा आणणारी माहिती समोर आली आहे. मुंडे यांच्या अंगावर १६ वार आहेत. महादेव यांचा आगोदर गळा कापला. त्यातील एक वार हा २० सेंमी.पर्यंत लांब, ८ सेंमी. रुंद आणि ३ सेंमी. खोल असा होता. त्यानंतर त्यांच्या मानेवर उजव्या बाजूने चार वार करण्यात आले. विशेष म्हणजे प्रतिकार करतानाही त्यांच्या हाताला जखमा झाल्याचे अहवालात नमूद आहे. यामध्ये महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आमदार धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावरून वाल्मिक कराडने फोन केला आणि तपास थांबवला असा थेट आरोप केला आहे.

------------

### अडीच हजाराची लाच घेताना

मंडळ अधिकारी कार्यालयात पडताळणी केली असता अशोक सुडके यांनी तक्रारदार यांच्याकडे तीन हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती हे निष्पन्न झाल्यानंतर आज रोजी सुडके यांनी तक्रारदार यांच्याकडून ऐनवेळी तीन हजार रुपयाची पाचशे रुपये कमी दे म्हणून अडीच हजार रुपये शासकीय पंचायत समक्ष स्वीकारताना रंगेहात पकडले यानंतर यातील आरोपी मंडळ अधिकारी यांच्या अहिल्यानगर येथील घराची झाडाझडती घेण्याचे आदेश एसीबीच्या अधिकाऱ्यांनी दिले आहेत ही कारवाई पर्यटन अधिकारी पोलीस उपाधीक्षक सोपान चित्तमपल्ली पोलीस निरीक्षक राहुल कुमार भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान कवडे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुरेश सांगळे पोलिस आमदार पांडुरंग काचगुंडे अनिल शेळके मच्छिंद्र बिडकर गणेश मैत्री अविनाश गवळी अमोल खरसाळे प्रदीप सुरवसे अंबादास पुरी यांनी केली.

------------

### जामीन मिळताच प्रोफेशनलचे गलीच्छ

दाखल करण्यात आला होता या गंभीर प्रकरणी बीड शहरातील पालकांनी मोर्चे आणि निवेदने दिली होती या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन केल्यानंतर नुकतीच विजय पवार आणि प्रशांत हटकर या दोघांनाही जामीन मिळाला परंतु या दोघांनाही जामीन मिळताच समाज माध्यमावर काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत हे व्हिडिओ अत्यंत गलिच्छ असल्याचेही दिसत आहे यामध्ये संबंधित व्यक्ती पवार आहे की नाही याची खात्री देता येत नसली तरी समाज माध्यमावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमुळे आणखी पालक वर्गात रोष आणि संताप व्यक्त केला जात आहे हे व्हिडिओ पवार यांच्या क्लासेस मधील आहेत की इंग्लिश स्कूल मधील हे सांगता येत नसले तरी बोट मात्र त्यांच्याकडेच ठेवली जात आहे हा व्हिडिओ त्यांचाच आहे की अन्य कोणाचा हे देखील सांगता येत नसले तरी बोट मात्र पवाराकडे दाखवले जात असल्याने एक प्रकारे संताप व्यक्त केला जात आहे या प्रकरणाची चौकशी महिला आयपीएस अधिकारी असलेल्या एसआयटी पथकाकडून होत आहेत या चौकशीमध्ये पुरावे आणि काही माहिती अधिकची मिळाली असल्याचे समजते न्यायालयामध्ये हे प्रकरण असल्याने न्यायालयात एसआयटीने आणखी पुरावे सादर केल्यास या दोघांनाही पुन्हा अटक होऊ शकते अशी चर्चा आहे.

-----------

### बंदुकीचा धाक दाखवत

तरूण पीएसआय झाल्यामुळे तो बीड जिल्हा सोडून गेला. परंतू वारंवार माझ्याशी संपर्क करत होता. २०१३ मध्येरात्रीच्या वेळी बळजबरी घरात घुसून बंदुकिचा धाक दाखवून बलात्कार केला.नग्न फोटो व व्हिडीओ काढले या प्रकाराविषयी कोणाला काही सांगितले तर तुला व तुझ्या पतीला खोट्या गुन्ह्यात अडकून टाकेल अशी धमकी दिल्याचे म्हटले आहे. पिडित महिला ही विवाहीत असतांनाही पीएसआय असलेल्या तरूणाने वारंवार पिडितेच्या घरी जाऊन तिच्यावर अत्याचार केले. त्यातून दिला गर्भ राहिला.त्यानंतर त्याने बळजबरीने गर्भपात करायला लावला. त्यानंतरही अनेकवेळा त्याने अत्याचार पिडितेने म्हटले आहे. १ जुन २०२५ रोजी बीड येथील राहत्या घरी येऊन त्या पोलीसाने पुन्हा शिवीगाळ करून बळजबरी केली. सदरील प्रकारानंतर १ जुलै २०२५ रोजी पुन्हा त्या पोलीसाने तुला व तुझ्या कुटूंबाला जिवे मारूण टाकील, ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करील अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी पिडितेच्या फिर्यादीवरून दि.२१ जुलै २०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात रविंद्र लिंबाजी शिंदे याच्या विरूध्द कलम बीएनएस ६४(२)(एम),११५(२), ३५१(२), ३५१(३), ३५२, शस्त्रअधिनियम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला .

-----------

### नशेच्या गोळ्या विक्री प्रकरण

तपासात पोलिसांना शेख फारुक शेख आरेफ (रा. इस्मालमपूरा, बीड) या मेडिकल चालकाने या गोळ्यांची विक्री केल्याचे समोर आले होते. त्याला पोलिसांनी अटक केली त्याच्या चौकशीत त्याला इनामदार मोहम्मद तारीखोद्दीन मोहम्मद नुरुद्दीन (रा. शहेंशाहर नगर) या गोळ्या पुरवठा केल्याचे समोर आले. त्यालाही पोलिसांनी अटक केली. त्यामुळे या प्रकरणातील एकूण आरोपींची संख्या ६ झाली आहे. सदरील कामगिरी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शन प्रमाणे पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ,सपोनी बाबा राठोड, पोलिस अंमलदार सचिन अलगट, संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, यांनी केली आहे. या प्रकरणी बीड शहर पोलिस अधिक तपास करत आहेत.

---------

### गडकरींना लोकमान्य टिळक

वतीने हा सन्मान प्रदान केला जाईल. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

----------

### राजुरीत गावठी कट्ट्यासह

ठिकाणी छापा टाकला असता एक इसम प्रदीप अशोक वखरे, वय २७ वर्ष, रा. माळी गल्ली, राजुरी (न) ता.जि बीड हा मिळुन आला त्याचे अंगझडती घेतली असता पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा मॅगझीनसह मिळून आला. सदरील गावठी कट्टा त्याला गणेश श्रीराम बहीर रा.राजुरी (न) ता.जि बीड याने दिल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपीविरुदध पोलीस ठाणे बीड ग्रामीण गु.र.नं २३७/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियमाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.सदरील कामगिरी ही नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, विष्णु सानप, विकास राठोड, भागवत शेलार चालक अतुल हराळे यानी केली आहे.

-------------

### मकरंद पाटील असणार नवे

खात्याच कारभार सोपवण्यात येणार असल्याचेही सूत्रांनी सांगितल्याचे समजते. मकरंद पाटील यांच्याकडे सध्या मदत आणि पुनर्वसन खाते आहे. पाटील यांच्याकडे कृषीमंत्रीपद सोपवल्यानंतर त्यांचे मदत आणि पुनर्वसन खाते हे कोकाटे यांना देणार अशी माहिती देखील सूत्रांनी दिली आहे.

------------

### गाभाऱ्याला टेकू, शीळांना तडे

यात तात्पुरती डागडुजी करून संरचना सुरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, मंदिर संस्थान या उपाययोजनांवर समाधानी नसून, कायमस्वरूपी उपायाची मागणी करत आहे. यासंदर्भात तिसरा आणि अंतिम अहवाल आल्यानंतरच शिखर उतरवण्याचा अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर संस्थांचे विश्वस्त आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर लवकरच मुंबईत उच्चस्तरीय बैठक घेण्यात येणार असून, मंदिर संस्थेचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी याबाबत दुजोरा दिला आहे. मंदिराच्या शिखरावर झालेल्या संभाव्य कारवाईमुळे पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही शिखर उतरवण्याच्या चर्चेला मंदिरातील पुजारी वर्गाने तीव्र विरोध केला होता. त्यामुळे पुढील निर्णय अत्यंत संवेदनशीलपणे घेण्यात येणार आहे.सध्या गाभाऱ्यात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी नियंत्रण ठेवण्यात आले असून, भाविकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचीच वाट पाहावी, असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे. तुळजाभवानी मंदिरातील मुख्य गाभाऱ्याच्या काही प्राचीन शेळ्यांना तडे गेल्याची बाब पुरातत्व विभागाचे अधिकारी व जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी केलेल्या संयुक्त पाहणीत उघड झाली होती. मंदिर गाभार्यातील फरशी व मुलांना दिलेला भाग काढून टाकल्यानंतर काही शिळा खचले आहेत तर काहींना तडे गेले आहेत .तुळजाभवानी मंदिरातील गाभाऱ्याच्या जतन व संवर्धन म्हणजेच जीर्णोद्धाराचे काम पुरातत्व विभागाच्या निग्रणीखाली सुरू असताना हा प्रकार घडल्याने मोठी खळबळ उडाली.

------------

### शिंदेंच्या खात्यावर

यांची मंजुरी बंधनकारक करण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने नगरविकास आणि ग्रामविकास खाती ही महत्त्वाची मानली जातात. त्यातील नगरविकास खाते हे एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. तर ग्रामविकास खाते भाजपकडे आहे. नगरविकास खात्याची उलाढालही मोठ्या प्रमाणात असते. हे महत्त्वाचे खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे आहे. यापुढे मुख्यमंत्र्यांच्या सहीशिवाय आता नगरविकास खात्याला कोणताही निधी वाटप करता येणार नाही. त्यामुळे शिंदे यांच्या खात्याचा स्वतंत्र निधीवाटपाचा अधिकार आता मर्यादित झाला आहे. मुख्यमंत्रिपदाचा कार्यकारभार सांभाळणा-या फडणवीस यांनी शिंदे यांच्या 'सढळ हस्ते निधी वाटप' करण्याच्या पद्धतीला लगाम घातल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. यापूर्वीही देवेंद्र फडणवीसांनी मंत्रिमंडळातील मित्रपक्षांच्या मर्जीतील ओएसडी आणि पीएच्या नियुक्त्याही नाकारल्या होत्या. त्यामुळेच आधीच मित्रपक्षांत नाराजीचे वातावरण होते. त्या निर्णयानंतर आता निधीवाटपावरही थेट मुख्यमंत्री कार्यालयाचे नियंत्रण राहणार असल्याने महायुतीतील अंतर्गत संघर्ष नव्या वळणावर जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीतील सत्तासंघर्ष, नियंत्रण आणि स्वायत्ततेचा खेळ अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच फडणवीसांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. विविध योजनांच्या माध्यमातून नगरविकास खात्यातून आमदार आणि महापालिकेतील नगरसेकांना निधी पुरवला जातो. पण अलीकडे नगरविकास खात्यातून फक्त शिंदे गटाच्या आमदार आणि नगरसेवकांनाच निधी दिला जात असल्याच्या तक्रारी भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या आमदारांकडून करण्यात आल्या होत्या. त्यानंतर फडणवीसांनी मुख्यमंत्री कार्यालयाने आता नगरविकास खात्याच्या निधीवाटपावर अधिक नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## टी.सी.हरवला आहे

धनवडे शिवानी भाऊसाहेब पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय यांचा १२ वी पासचा टी.सी आष्टी ते मिरजगाव बस प्रवासात हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास संपर्क करावा.

-::संपर्क::-

मो. ७०२०८८८०४१

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २४ जुलै २०२५





बीड : आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व.बाळु बापुराव नवले यांच्या वारस आई श्रीमती संगीता बापुराव नवले रा.पाली ता.बीड यांना शासकीय मदतीचा रु.७०,०००/-चा चेक सुपुर्द करताना तहसीलदार श्री.चंद्रकांत शेळके

## थोडक्यात...

### संत नामदेवनगर मध्ये तुकाराम माऊली येहळेगाव,यांच्या पोथीचे वाचन

बीड। प्रतिनिधी

संत नामदेव नगर,मध्ये,रुक्मिणीकांत सांप्रदायिक वारकरी मंडळाचे सदस्य श्री आर.डी.देशमुख यांच्या निवास स्थानी आषाढी कामिका एकादशीला (दिनांक , २१जुलै २५ रोजी सोमवारी)तुकाराम माऊली येहळेगाव यांच्या नऊ अध्यायी पोथीचे सामुदायिक वाचन करण्यात आले, यावेळी, श्री प्रभाकर राव कुलकर्णी,श्रीहरीभाऊ बुगदे आणि सौ, कुंदा बुगदे,,सौ,अंजली रत्नपारखी, सौ.नलिनी एकबोटे,,सौ,कुंदा कुलकर्णी,श्रीमती लीला ताई मानुरकर मामी, श्री आणि सौ.धसे ,श्री आणि,सौ.भुजबळ,श्रीमती कुलकर्णी सिस्टर,,सौ, लतिका जोशी,सौ, जोजारे.,सौ,राधा सुर्डीकर, सौ.देशमुख,,सौ,खटावकर, सौ दया साबळे,श्री जगदीश राव देशमुख, इत्यादी उपस्थित होते. सौ, शारदा ताई देशमुख आणि श्री आर.डी.देशमुख यांनी खूप परिश्रम घेतले. संत नामदेव नगर येथील रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ निरनिराळे उपक्रम घेत असते तुकाई पोथीचे नऊ अध्याय वाचन उपक्रम सुरू झाल्याबद्दल सर्वांना अतिशय आनंद झाला.श्री बाळासाहेब पारगाव कर,यांच्या मार्गदर्शना नुसार दर महिन्यात एकादशीस असा कार्यक्रम घेतला जाणार असे त्यांनी म्हटले.असे,प्रसिद्धी विभाग प्रमुख,प्रा. डी.एस. कुलकर्णी यांनी कळविले आहे.

### शुभम शिंदेची नवोदय साठी निवड

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा येथील नववी वर्गातील विद्यार्थी शुभम विनोद शिंदे यांनी नवोदय परीक्षेत चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होऊन सुयश प्राप्त केले त्याची नवोदय विद्यालय गढी येथे निवड झाली आहे

शुभम या परीक्षेत पास झाल्याबद्दल जी प शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शालेय शिक्षण समितीचे सदस्य गावकरी यांनी शुभम ला शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

### तांदळेश्वर विद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात संपन्न

बीड नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची



जयंती संपन्न झाली या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक श्री श्याम डाके सर व त्यांचे सर्व सहकारी यामध्ये श्रीवामने सर पवार सर काशीद सर कुठे सर काटवटे लहाने सर काळे सर घोडके सर इत्यादी सर्वजण उपस्थित होते. महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून सर्वांनी लोकमान्य वंदन केले श्री डाकेसर यांनी लोकमान्य स्वातंत्र्य चळवळीच्या काळामध्ये देशासाठी देश स्वातंत्र्य होण्यासाठी चे मोलाचे कार्य विशद केल.

# सेवा समर्पित उपक्रमांत सातत्य व व्यापकता आणणार- अजय मुंडे

## शिक्षण, संस्कृती, मार्गदर्शन आणि सेवा:अजिदादांचे अभिष्टचिंतन व सेवासंकल्प सप्ताहाचा नेत्रदीपक समारोप

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत सेवासंकल्प सप्ताह अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभाने एक उत्स्फूर्त, नेत्रदीपक आणि संस्मरणीय असा सोहळा अनुभवायला मिळाला. शिक्षण, संस्कृती आणि सेवा , अजिदादांचे अभिष्टचिंतन व सेवासंकल्प सप्ताहाचा नेत्रदीपक समारोप झाला.या सोहळ्यात गुणवंतांचा गौरव, मान्यवरांचे मार्गदर्शन हे दीपस्तंभ ठरले.**



राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवासंकल्प सप्ताहाचा नेत्रदीपक समारोप झाला. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे (जिरंगे), जिल्हा परिषद गटनेते मा. अजय मुंडे, शिक्षणतज्ज्ञ प्रा. महेश पाटील, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी, दिव्यांग महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, तसेच नगर परिषद मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांचा समावेश होता. गुणवंतांचा गौरव जेईई, नीट,सीईटी,सीए तसेच दहावी व बारावी परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या सोहळ्यात विशेष सत्कार करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. याबरोबरच सेवासंकल्प सप्ताहात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा योगासन, मृदंग वादन, महिला भजन, सांस्कृतिक कार्यक्रम, सामान्य ज्ञान व रील स्पर्धा यामधील विजेत्यांनाही यावेळी गौरवण्यात आले. मान्यवरांचे मार्गदर्शन ठरले दीपस्तंभ ! यावेळी मार्गदर्शन करतांना अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे (जिरंगे) यांनी सांगितले की, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द आणि परिश्रम चिकाटीने करायला हवे.यश हे सततच्या प्रयत्नांतून मिळते. त्यामुळे श्रममूल्याचे महत्त्व आपल्या मुलांना रुजवले पाहिजेत. माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी मुलांच्या शैक्षणिक वाटचालीत अडसर ठरत असलेल्या मोबाईल च्या अवास्तव वापरावर बोट ठेवत सोशल मिडिया हे दुधारी शस्त्र आहे, त्याचा योग्य उपयोग विद्यार्थ्यांनी करावा. दररोज वर्तमानपत्र वाचनाची सवय लावा. अवांतर वाचन ही जडणघडणीचा पाया असल्याचे सांगितले. शैक्षणिक मार्गदर्शन करतांना व्याख्याते व शिक्षणतज्ज्ञ प्रा. महेश पाटील यांनी आपल्या खुमासदार शैलीत परीक्षा पद्धती, गुणांकन प्रणाली यावर भाष्य केले. केवळ आपली मुले ही रेसचे घोडे आहेत ही मानसिकता बदलावी. पालकांनी देखील मुलांच्या शैक्षणिक वाटचालीत सक्रिय सहभाग घ्यावा. परिक्षेत मिळवलेल्या टक्केवारीवर गुणवत्ता ठरवणे हा फुगवटा असुन या फॅडातून बाहेर पडा असे आवाहन त्यांनी केले. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी सेवा संकल्प सप्ताह ही नेत्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने समाजाभिमुख उपक्रम राबवण्याची आदर्श संकल्पना असल्याचे सांगितले. सेवा संकल्प सारखे उपक्रम राजकीय पक्षांनी राबविल्यास जनतेला फायदा होतोच, पण प्रशासनालाही या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते असे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी सांगितले.सेवा समर्पित उपक्रमांत सातत्य व व्यापकता आणणार अशी ग्वाही जि.प.गटनेते अजय मुंडे यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी रा.कॉ. तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सेवासंकल्प सप्ताहातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा मांडला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भविष्यातही असेच लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत राहील. असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शेखर अंकल फुटके व चेतना गौरशेटे यांनी केले तर अजय जोशी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि सहभागी शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे आभार मानले.या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व सहकारी, शिक्षक बंधू-भगिनी, विद्यार्थी आणि पालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. सेवा संकल्प सप्ताह हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम न राहता, तो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## आनंदवाडीत आज बबन महाराज तर उद्या भागवत उंबरेकर महाराज यांचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील आनंदवाडी येथे संत शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळा व संत नामदेव महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दि.१८ ते २५ जुलै २०२५ या कालावधीत सावता महाराज चरित्र कथा व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा होत आहे.संत सावतामाळी पुण्यतिथीनिमित्त आनंदवाडी येथे आज गुरुवार दि.२४ जुलै रोजी ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल व उद्या शुक्रवार दि.२५ जुलै रोजी वृध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.भागवत महाराज उंबरेकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.**



अखिल विश्वातील मानव जातीतील जिवंत कर्मयोग व भक्ती योग शिकवणारे महान संतश्रेष्ठ ज्ञानवैष्णव श्री संत नामदेव महाराज व श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळा पंढरीश पांडुरंगाच्या कृपेने संत वै.रघुनाथ महाराज उंबरेकर यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. भागवत महाराज उंबरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. भाविक भक्तांनी या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सप्ताह समितीने केले आहे. या सप्ताहात काकडा आरती, विष्णु सहस्त्रनाम व प्रार्थना,सावता महाराज चरित्र, हरिपाठ,हरिकीर्तन व हरिजागर आदि धार्मिक कार्यक्रम होत आहेत. या सप्ताहात ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे, ह.भ.प.सोमीनाथ महाराज मेटे, ह.भ.प.दिपाली खिळे महाराज, ह.भ.प.दादा महाराज राऊत, ह.भ.प.भाऊसाहेब महाराज अन्हाड, ह.भ.प.निवृत्तीदादा महाराज बोडखे यांचे हरिकीर्तन झाले आहेत.आज गुरुवारी संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचे हरिकीर्तन आहे.उद्या शुक्रवारी सकाळी १० ते १२ यावेळात ह.भ.प.उंबरेकर महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने भावीकांनी उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ आनंदवाडी यांनी केले आहे.

## टिळक-आझाद यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील कै. देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नूतन विद्यालय, प्राथमिक विभाग अंबाजोगाई या ठिकाणी ‘‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच !‘‘ अशी गर्जना करणाऱ्या लोकमान्य टिळक व ‘‘में आझाद हुँ आझाद रहूंगा ‘‘ असे म्हणणाऱ्या क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री.खंडेराव नांदगावकर, सकाळ सत्र प्रमुख श्री हनुमंत इंगळेवाड, शिक्षक प्रतिनिधी श्री अनंत जोशी व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. यानंतर विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक प्रक्रियेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी धनराज कदम व समर्थ देशपांडे तसेच विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. अस्मिता पेडगावकर व कु. श्रेया लाड यांचे स्वागत करण्यात आले. लोकमान्य टिळक व क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या विषयी विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रगट केले. शाळेतील सहशिक्षिका श्रीमती स्नेहा बर्दापुरे यांनी कार्यक्रमावर आधारित विद्यार्थ्यांचे प्रश्नोत्तरे घेतली. त्यासोबत गोष्टी स्वरुपात माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती स्नेहा बर्दापुरे यांनी केले.

पान ६ वरून...

### पोलिस अधीक्षक नवनीत

अधीक्षक यांची भेट घेऊन एक फरार आरोपी यांना तत्काळ अटक करावी अशी मागणी केली.या संदर्भात पोलिस अधीक्षक यांनी ठाणे प्रमुख आणि पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना सूचना देऊन या गुन्ह्यातील उर्वरित आरोपींना तत्काळ अटक करावी असे आदेश दिले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरू,सपोनि मनोज निलंगेकर उपनिरीक्षक स्वापनिल कोळी उपनिरीक्षक कैलास अन्नादास सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### ना.पंकजाताई मुंडे यांच्या

भाजपा च्या वतीने आयोजित केलेल्या सामाजिक उपक्रम कार्यक्रमाचे कौतुक केले. ना. पंकजाताईंचा वाढदिवसाच्या निमित्ताने लाभ व मदत तळागाळातील व गरजू लोकांपर्यंत भाजप कार्यकर्ते पोचवत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विन मोगरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय दहिवाळ यांनी केले.

यावेळी राजेंद्र ओझा, महादेव इटके, अरुण पाठक, उमेश खाडे, सुशील हरंगुळे, नितीन समशेट्टी, मोहन जोशी, अरुण पाठक, सचिन गित्ते, अनिश अग्रवाल, सारिका कुरिल, प्रशांत कराड, किशोर केंद्रे, योगेश पांडकर, विजय बुंदेले, बाळू फुले, राहुल घोबाळे, बंडू नाना कोरे, श्रीपाद शिंदे, दिलीप नेहरकर, उमेश निळे, अच्युत जोगदंड, कृष्णा बेदरकर, योगेश मुंडे, विराज गित्ते, आदी उपस्थित होते.

### आ. धस यांची कोरोना

सुरेश धस हे समाजासाठी अहोरात्र कार्य करणारे लोकप्रतिनिधी आहेत. आतापर्यंत मराठा आरक्षण प्रश्नासाठी शासन दरबारी प्रयत्न केले आहेत मराठा आरक्षणासाठी विधानसभेपासून रस्त्यावरच्या लढाई मध्ये सतत समाजासोबत शासनाकडे लढाई लढत आहेत.. अशा प्रकारचे चार-पाच खटले त्यांच्यावर आष्टी न्यायालयात देखील दाखल झाले होते त्यात देखील ते निर्दोष सुटले आहेत अशा प्रकारचे त्यांच्यावर खटले दाखल झाले तरीही समाजकार्याचा वसा आणि वारसा त्यांनी जोपासला आहे.. या खटल्यामध्ये आमदार सुरेश धस आणि इतरांच्या बाजूने ॲड.नामदेव साबळे आणि ॲड. दिनेश हंगे आणि सहकाऱ्यांनी काम पाहिले... याप्रसंगी न्यायालयामध्ये उपस्थित वकील बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले.

### गोदावरी नदीपात्रात

अवैध वाळू चोरटी उपसाट्रॅक्टर व केणी च्या साह्याने करीत असल्याबाबत गोपनीयमाहिती मिळाल्याने पथकाने जाऊन रेड केली असता अंधाराचाफायदा घेऊन तेथील इसम पळूनगेले त्यामध्ये एक जागीच पकडला. एकूण चार ट्रॅक्टर व केन्या ताब्यातील आरोपीकडून जप्त केल्या. असा एकूण २३,००,०००/-(तेवीस लाख रुपये )किमतीचा मुद्दाम तपासणी जप्त करून चार आरोपी विरुद्ध गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहेव एक आरोपी मुद्देमाल सह पोलीस स्टेशन येथे हजर केला आहे.सदरची कार्यवाही पोउपनि/सिध्देश्वर मुरकुटे व टीम यांनी केलेली आहे

### प्रपंच करून परमार्थ साधता

जीवन जगण्याचा मूलमंत्र आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य आनंदाने करणे हाच खरा धर्म असून याच धर्माला जगाचा आधार असणाऱ्या पांडुरंगा चे मान्यता आहे म्हणून पांडुरंग हे सावता बाबाच्या मळ्यात येतात असे ह भ प रंधवे महाराज म्हणाले.सकाळी दहा ते बारा या वेळेत झालेल्या या कीर्तनाला प्रचंड जनसमुदाय भाविक भक्त उपस्थित होते बीडचे आमदार संदीप भैया क्षीरसागर तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष अरुण नाना डाके. माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणजी आखाडे, समाजसेवक अशोक लोढा, रामविलासजी जाजू इत्यादींची यावेळी उपस्थिती होती. सर्वांचा सत्कार यावेळी मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आला.शेवटी नव्याने उभारण्यात आलेल्या सावता मंदिरात सावता महाराजांच्या महाआरतीचा मान डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांना मिळाला.महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम सानंद पार पडला.

### सुधारित पीक विमा

घेऊ शकतात. योजनेत भाग घेतलेल्या शेतकऱ्यांनी नंतर ई-पीक पाहणी नोंद पूर्ण करून घेणे बंधनकारक आहे.या योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाईच्या माहितीसाठी केंद्र शासनाच्या कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ वर, बीड जिल्ह्यासाठी असलेली विमा कंपनी आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि स्थानिक सहायक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी या कार्यालयांशी संपर्क साधावा, असेही श्री. साळवे म्हणाले.

### अनैतिक मानवी वाहतूक

सकाळी ची टीम ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशाने पुणे साठी रवाना झाली. पुणे शहरात लक्ष्मीनगर , वाल्हेकरवाडी येथील एका अपार्टमेंट च्या फ्लॅट मधे चिंचवड पोलीस ठाणेच्या हद्दीत पीडित मुलगी ही आरोपीच्या ताब्यात मिळून आली. सदर पीडीतेला व आरोपीला ताब्यात घेवून ची टीम बीडला आली. त्यांना पुढील तपासकामी पोस्टे शिवाजीनगर येथे हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांचा वडवणी येथे विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा

वडवणी । प्रतिनिधी

दि. २२ जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे कार्यक्षम मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी शहरामध्ये भारतीय जनता पार्टीचे युवा नेते श्री.धनराज अप्पा मुंडे आणि मित्रपरिवाराच्या वतीने वडवणी शहरातील सेवा गुरुकुल,संस्कार गुरुकुल, आणि ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल मधील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले तसेच ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे!

पक्षीही सुस्वरे आळवीती!!वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे, कारण ती पर्यावरणाच्या संतुलनासाठी



आणि मानवी जीवनासाठी आवश्यक आहे. तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे या संकल्पनेतून वृक्ष लागवड करण्यात आली व विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना फळे वाटप करण्यात आले कार्यक्रमच्या सुरुवातीला ज्यांनी भारतीय जनता पार्टी तळागाळातल्या सामान्य माणसापर्यंत पोहोचवली असे स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाला उपस्थित श्री.छगनजी आंधळे, माजी नगरसेवक श्री.प्रेमदास राठोड, मराठी पत्रकार संघाचे बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव सर, एस.एम.न्यूज चैनल चे संपादक सतीश मुजमुले,पत्रकार बाबुराव तिडके,उद्धव कांगणे सर, प्रा.विष्णू डोईफोडे सर, सुभाष राठोड,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## आजच्या कर्जमाफीसाठी होणाऱ्या चक्काजाम आंदोलनास शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे -गोपाळ पैंजणे

माजलगाव । प्रतिनिधी

**शेतकरी कर्जमाफीच्या प्रमुख मागणीसाठी आज दि २४ जुलै गुरुवार रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू याच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या सर्वपक्षीय कार्यकर्ते संपूर्ण महाराष्ट्र मध्ये चक्काजाम आंदोलन करणार असून माजलगाव तालुक्यातील वसंतराव नाईक चौक परभणी फाटा येथे साकळी ११:३० वाजता चक्काजाम आंदोलन होणार आहे त्यामुळे शेतकरी तसेच सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान प्रहारचे तालुकाध्यक्ष गोपाळ पैंजणे यांनी केले आहे.**



गेल्या काही महिन्यापासून प्रहार चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चु कडू यांनी शेतकरी सातबारा कोरा करण्यासाठी कर्जमाफीची मागणी शासनाकडे केली आहे त्यासाठी त्यांनी आमरण उपोषणही केले नंतर पदयात्रा काढली आता कर्जमाफी बाबत प्रत्येकाने आवाज उठवणे गरजेचे असल्याने आंदोलनाच्या पुढील टप्पा म्हणून आज दि २४ जुलै गुरुवार रोजी राज्यभर चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही केवळ शेतकरी,दिव्यांग, मेंढपाळ,मच्छीमार, कर्मचारी याच्या विविध प्रश्नासाठी एकत्र येऊन शासनाकडे कर्जमाफीची मागणी जोरकसपणे मांडण्यासाठी चक्काजाम आंदोलन केले जाणार आहे यासाठी सर्वपक्षीय कार्यकर्ते पदाधिकारी तसेच आजी माजी सैनिक संघटनांनी आज दि २४ जुलै रोजी सकाळी ११:३० वाजता वसंतराव नाईक चौक परभणी फाटा माजलगाव येथे येऊन चक्काजाम आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा द्यावा असे आव्हान माजलगाव प्रहार जनशक्तीचे तालुका अध्यक्ष गोपाळ पैजणे यानी केले आहे

## काँग्रेस पक्षाच्या वतीने दिल्लीमध्ये ओबीसीच्या न्याय हक्कासाठी महासंमेलन-वसंत मुंडे

नवी दिल्ली । प्रतिनिधी

ओबीसीच्या विविध न्याय हक्काच्या मागण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष खा. श्री मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल जयहिंद, महाराष्ट्र ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २५ जुलै २०२५ रोजी तल कटोरा स्टेडियम, दिल्ली येथे काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाच्या वतीने देशपातळीवर महासंमेलन आयोजित केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिली.



मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०१४ मध्ये जातीनिहाय जनगणना आर्थिक स्थिती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, स्त्री पुरुष मुले वारस कुटुंबाची रोजगार, स्वतःचे घर किंवा किरायाचे घर, नोंदी, वाहने, उत्पन्नाचे माध्यम, कुटुंबाची मालमत्ता इत्यादी प्रक्रिया राबवून जनगणना केली. पण आरएसएस च्या विचारांच्या भाजप सरकारने त्रुटी काढून २३ सप्टेंबर २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले. त्यामध्ये मोदी सरकारने जातीय जनगणना करणार नाही, अशी शपथपत्राद्वारे माहिती सर्वोच्च न्यायालयाला दिल्यामुळे आजतागायत जातिनिहाय जनगणना होऊ शकलेली नाही.

दलित, वंचित, आदिवासी, ओबीसीवर खूप मोठ्या प्रमाणावर अन्याय झालेला आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने अनेक वेळा सरकारला तेलंगणा राज्याचे ७४ निकषांचे जातनिहाय जनगणनेसाठी मॉडेल वापरण्याची विनंती केली. परंतु अहंकारी सरकारला देशातील सर्वच आरक्षण संपवायचे आहे. त्यामुळे तेलंगाना पॅटर्न अहंकारी केंद्र सरकारने राबवण्यास नकार दिला.विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे व शेतकऱ्यांच्या तरुण युवक युवती च्या रोजगारासाठी सामान्य जनतेच्या महागाईच्या संदर्भात यासाठी देशभर पदयात्रा काढून जनजागरण करून दबाव तंत्राचा वापर केल्यामुळे सरकारला काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमुळे झुकावे लागले. म्हणून मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, के. राजू, डॉ. अनिल जयहिंद, भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे काँग्रेसच्या वतीने ओबीसी विभागाचे ऐतिहासिक महासंमेलन आयोजित केल्याची माहिती ओबीसी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी दिली.

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८२ दिनांक-०३/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती लक्ष्मी प्रभाकर काळे रा.महाकाळा ता. अंबड जि. जालना यांचा मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- |
| ओंकार प्रभाकर काळे | मुलगा | ०३/०९/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk

# शेतीसाठी कर्ज घ्यायचंय? आरबीआयने लागू केला नवीन नियम

देशात असे अनेक शेतकरी आहेत की ज्यांना शेती करायची आहे पण भांडवलाची कमतरता आहे. त्यांच्याकडे शेतीत गुंतवणूक करण्यासाठी पैसे नाहीत. अशा परिस्थितीत अनेक शेतकरी कर्ज घेऊन शेती करतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच आरबीआयने आता या लहान शेतकऱ्यांसाठी कर्ज घेण्यासाठी एक नवीन नियम लागू केला आहे. आरबीआयच्या या नियमामुळे आता लहान शेतकऱ्यांना कृषी कर्ज घेणे सोपे होणार आहे.

सोने-चांदी गहाण ठेवून शेती कर्ज

आरबीआयच्या नवीन नियमानुसार, आता शेतकरी त्यांचे सोने-चांदी गहाण ठेवून शेती कर्ज घेऊ शकतात. पूर्वी काहीही गहाण न ठेवता कर्ज घेण्याची मर्यादा होती, परंतू, आता नवीन नियमानुसार, शेतकरी आता स्वतःच्या इच्छेनुसार त्यांचे सोने-चांदी गहाण ठेवून कर्ज घेऊ शकतात. आरबीआयच्या या नवीन नियमामुळे लहान शेतकऱ्यांना कर्ज घेणे सोपे होईल. ११ जुलैपासून लागू झालेल्या या नियमानुसार, बँका आता शेतकऱ्यांचे सोने-चांदी गहाण ठेवून त्यांना २ लाख



रुपयांपर्यंतचे कर्ज देऊ शकतात. यामध्ये शेतकऱ्याची पूर्ण संमती आवश्यक आहे. या नवीन नियमाचा फायदा असा होईल की जर एखाद्या शेतकऱ्याने त्याचे सोने-चांदी गहाण ठेवले तर त्याला काहीही गहाण न ठेवता कर्ज घेण्याच्या फायद्यांपासून वंचित ठेवले जाणार नाही.


शेतकरी आणि बँका दोघांनाही फायदा

सोने आणि चांदी गहाण ठेवून कर्ज घेण्याची सुविधा असल्याने, शेतकरी आपत्कालीन परिस्थितीत सहजपणे कर्ज घेऊ शकतात. यासोबतच बँकांनाही या नियमाचा फायदा होईल. जर बँका सोने आणि चांदी घेतील तर त्यांचा धोकाही कमी होईल.

देशातील शेतकरी विविध संकटांचा सामना करतायेत

सध्या देशातील शेतकरी विविध संकटांचा सामना करत आहेत. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकट शेतकऱ्यावर येत आहेत. या परिस्थितीला तोंड देत शेतकरी चांगल उत्पादन काढत आहेत. दरम्यान, दिवसेंदिवस शेतीचा उत्पादन खर्च वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. वाढत्या खर्चामुळं शेती परवडेना असं झाल्याचं काही शेतकऱ्याचं म्हणणं आहे. अनेक शेतकरी वाढत्या कर्जाच्या ओझ्यामुळं आत्महत्या देखील करत आहेत. ११ जुलैपासून लागू झालेल्या या नियमानुसार, बँका आता शेतकऱ्यांचे सोने-चांदी गहाण ठेवून त्यांना २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देऊ शकतात. यामध्ये शेतकऱ्याची पूर्ण संमती आवश्यक आहे.

# हळद आणि आदरक पिकातील कंदकुज नियंत्रण



अ) बुरशीजन्य कंदकुज : १) कंदकुज चे प्रथम लक्षणे ही कंदातील कोवळ्या फुटींवर लगेच दिसून येतात. २) प्रथम पानांचे शेंडे वरून व कडांनी पिवळे पडून खालपर्यंत वाळत जातात. ३) खोडाचा जमिनीलगतचा भाग काळपट पडतो. ४) याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डा वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दिसतो. ५) प्रादुर्भावग्रस्त फुटवा ओढल्यास सहज हातामध्ये येतो. ६) या रोगामुळे साधारण उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक घट होते.

ब) जीवाणूजन्य कंदकूज : १) जीवाणूजन्य कंदकूज ओळखण्यासाठी रोगग्रस्त कंदाचा भाग धारदार ब्लेडने कापून स्वच्छ काचेच्या ग्लासमध्ये पाणी घेऊन त्याचे टोक त्यामध्ये बुडवावे. २) त्यामधून दुधासारखा स्राव पाण्यामध्ये आल्यास जिवाणूजन्य कंदकूज आहे हे ओळखावे.

हळद आणि आदरक कंदकूज व्यवस्थापन : १) कंद पोसण्याच्या कालावधीमध्ये हळदीला पाण्याची गरज मर्यादित असते. २) त्यामुळे सात महिने पूर्ण झाल्यानंतर हळदीस पाणी देण्याचा कालावधी हळूहळू कमी करत जावा. ३) आठ महिने पूर्ण झाल्यानंतर जमिनीच्या प्रकारानुसार पाणी बंद करावे. ४) त्यामुळे पानामधील अन्न कंदामध्ये उतरण्यास मदत होते व हळदीस उतारा चांगला मिळतो. ५) कंदकूज व्यवस्थापनासाठी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा २ ते २.५ किलो प्रति एकरी ३०० किलो सेंद्रिय खतामध्ये मिसळून जमिनीमध्ये द्यावे किंवा ड्रीप असलीस ट्रायकोडर्मा २ लिटर प्रति एकरी द्यावे. याचा वापर प्रतिबंधात्मक म्हणूनच करावा. ६) कंदकूजीस सुरवात झाल्यानंतर ब्लिटॉक्स, टाटा रॅलीस इंडिया लिमिटेड, कॉपर ऑक्सिक्लोराइड ५० टक्के डब्ल्यू.पी. ४५ ग्रॅम प्रति १५ लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ७) रोगाची तीव्रता जास्त असल्यास रेडोमिल गोल्ड, सिंजेंटा, मेटॅलॅक्सिल ४ टक्के + मँकोझेब ६४ टक्के डब्ल्यू.पी. (संयुक्त बुरशीनाशक) ४५ ग्रॅम प्रति १५ लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ८) आले पिकामध्ये जिवाणूजन्य मर असल्यास सोबत २ मिली,कासु-बी, धानुका, कासुगामाइसिन ३ टक्के एस. एल. प्रतिलिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ९) आळवणी करताना जमिनीत वाफसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकाला थोडासा पाण्याचा ताण द्यावा. १०) गरज वाटल्यास पुन्हा एकदा वरील औषधांची आळवणी करावी.

# मक्याच्या दाण्यांपासून चारा निर्मिती

यंदा जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. आता पाऊस होत असला तरीही पावसाची तूट आहे. हिरवा चारा उपलब्ध होत असल्याने चाऱ्याचा प्रश्न काहीसा मिटला आहे. परंतु पावसाळ्यात दुभत्या जनावरांना हिरवा चारा चरण्यासाठी बाहेर नेता येत नाही. हिरव्या चाऱ्याला पर्याय म्हणून ग्रामीण भागातील काही पशुपालक मक्याचे दाणे भिजवून हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती करण्यास प्राधान्य देत आहेत.

कशी करायची चारा निर्मिती? : काही ठिकाणी तयार केलेल्या चारा पद्धतीनुसार, मक्याच्या दाण्यांना २४ तास भिजत ठेवा. २४ तासानंतर हे दाणे गोणपाटात काढून घेतल्यानंतर त्याला मोड येतात. यानंतर मोड आलेले मक्याचे दाणे घरात सात ते आठ मातीच्या मोठ्या टोपल्या आणि प्लास्टिक ट्रे यात माती टाकून पेरून ठेवा. एका ठिकाणी ४०० ग्रॅम मका पेरून त्याला दररोज दर दोन तासाने पाणी द्यावे, यातून एका आठवड्यात हा चारा वाढून पुढे १२ दिवसांत त्याची संपूर्ण वाढ होईल. एका ट्रेमध्ये साधारण सहा किलोपेक्षा अधिक चारा उपलब्ध होईल. वेळ, पाणी अन् जागेचीही बचत : या चाऱ्यामध्ये पौष्टिक प्रथिने, कर्बोदके, चवदार जीवनसत्त्व, सूक्ष्म अन्न घटकांचे प्रमाण भरपूर आहे. कमी पाणी लागत असल्यामुळे हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. यामुळे कमी जागेत कमी खर्चात सगळ्या प्रकारच्या हवामानात वर्षभर चारा उत्पादन करणे शक्य आहे. भरडलेल्या धान्यापेक्षा पौष्टिक : दुभत्या जनावरांना चारा म्हणून भरडलेले धान्य मोठ्या प्रमाणात दिले जाते. मात्र, पशुपालकांनी शोधलेल्या हायड्रोफोनिक चारानिर्मिती तंत्राच्या माध्यमातून केली जाते. हा चारा भरडलेल्या धान्यापेक्षा सुद्धा पौष्टिक आहे. शंभर टक्के सेंद्रिय, शेळ्यांनाही उपयोगी : चारा तयार करण्यासाठी कोणतेही रासायनिक खत किंवा औषध वापरले जात नसल्याने हा चारा १०० टक्के सेंद्रिय आहे. हा चारा शेळ्या आवडीने खात असून, यामुळे शेळीचे आरोग्य चांगले राहते.



# ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल

ठिबक सिंचन संच विकत घेण्यासाठी प्राथमिक स्वरूपाचा खर्च खूप आहे. ठिबक सिंचन संच जास्तीत जास्त काळ टिकावा असे शेतकऱ्यांना वाटणे साहजिक आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन संचाची योग्य ती काळजी व निगा वेळोवेळी घेणे गरजेचे आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन यासाठी सूक्ष्म सिंचनाचा भाजीपाला व फळ पिकात अवलंब केला जातो परंतु आता ऊसासारख्या पिकातही ठिबक सिंचनाचा वापर होताना दिसतो आहे. म्हणजेच ठिबक सिंचनाचा वापर वाढतो आहे. सूक्ष्म सिंचन पद्धतीत ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल घेणे जरुरीचे आहे. ठिबक सिंचन संचाची कार्यक्षमता कायम राखण्यासाठी संचाची वेळोवेळी देखभाल करणे गरजेचे आहे. जेणेकरून वेळेची आणि उर्जेची बचत होते व संचाचे जीवनमान वाढते.

ठिबक सिंचन संच सुरू करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी : १) ठिबक सिंचन संच बसविल्यानंतर प्रथम मुख्य व उपमुख्य लाईनचे फ्लश व्हॉल्व्ह उघडे करून जोडणीच्या वेळी पाइपलाइनमध्ये राहिलेला कचरा व माती काढून टाकावी. २) हा कचरा ड्रीपर मध्ये अडकू शकतो. स्वच्छ पाणी आल्यानंतर सर्व फ्लश व्हॉल्व्ह बंद करावेत. ३) फिल्टर चा बॅक फ्लश व्हॉल्व्ह बंद असल्याची खात्री करून घ्यावी. ४) बायपास आणि मुख्य कंट्रोल व्हॉल्व्ह उघडून पंप सुरु करावा. बायपास व्हॉल्व्ह हळूहळू बंद करत पूर्ण ठिबक संचामध्ये आवश्यक पुरेसा दाब निर्माण होईल, त्यावेळी तो स्थिर ठेवावे. ५) गाळण यंत्रातील दाबाचा फरक तपासून पाहून ठिबक संचाच्या शेवटच्या टोकास आवश्यक दाब आहे किंवा नाही याची खात्री



करावी.

ठिबक सिंचन संच सुरू असताना घ्यावयाची काळजी : १) ठिबक सिंचन संचातील व्हॉल्व्ह, पाणी मापक व दाबमापक व्यवस्थित काम करतात किंवा नाही हे तपासणे. २) व्हॉल्व्ह दाबमापक व्यवस्थित काम करीत नसल्यास बदलावीत. ३) जाळीच्या गाळणी यंत्रात जाळी व्यवस्थित आहे की नाही ते पाहावे, जाळी फाटलेली असल्यास नवीन बसवावी. ४) तसेच रबर सील व्यवस्थित आहे की नाही पाहावे, गाळणी यंत्रात वाळू योग्य आहे की नाही ते पाहावे. ५) वाळू कमी असल्यास गाळणी यंत्रामध्ये वाळू टाकावी.

पंपाची देखभाल : १) पंपाच्या पुढे एक पाणी मोजण्याचे यंत्र (वॉटर मीटर) बसवावे. २) पाण्याचा प्रवाह किंवा पाण्याचा दाब आवश्यकतेपेक्षा कमी अधिक झाल्यास पंप तपासून त्याची कारणे शोधावीत व दुरुस्ती करावी. ३) दर दोन दिवसांनी पंपाचा आवाज, त्याचे तापमान, गळती तपासावी. ४) विद्युत मोटार, स्विचेस, मीटर व स्टार्टर यांची उत्पादकाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार निगा ठेवावी.

मुख्य नळीची देखभाल : १) मुख्य नळी आठवड्यातून एक वेळा स्वच्छ करावी. २) मुख्य नळी शेवटच्या टोका जवळील फ्लॅश व्हॉल्व्ह उघडून जास्त दाबाने मुख्य नळी साफ करावी. ३) मुख्य नळीतून स्वच्छ पाणी येऊ लागल्यानंतर फ्लॅश व्हॉल्व्ह बंद करावा.

लॅटरलची देखभाल : १) लॅटरल आठवड्यातून एक वेळा स्वच्छ कराव्यात. २) लॅटरल स्वच्छ करण्याकरिता लॅटरल चे शेवटचे टोक उघडावे. ३) एका वेळी एकच लॅटरल स्वच्छ करावी, लॅटरलमधून स्वच्छ पाणी येऊ लागले म्हणजे लॅटरलचे शेवटचे टोक बंद करावे. ४) शेतामध्ये फिरून लॅटरलर्सचे निरीक्षण केले पाहिजे, लॅटरलमध्ये गळती आढळून आल्यास गुफ प्लगच्या साह्याने बंद करावी. ५) तण काढणे, कोळपणी करणे इत्यादी शेतातील कामे करतांना लॅटरलला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

ड्रीपर्स ची देखभाल : १) ड्रिपर्समधून ठराविक प्रवाह गतीने झाडास पाणी मिळते की नाही यासाठी शेतामध्ये संचाचे वेळोवेळी निरीक्षण करावे. २) झाडाजवळील जमिनीचा भाग सारख्या प्रमाणात ओला झाला की नाही हे पाहावे. ३) ज्या झाडाजवळ जमिनीचा भाग कमी प्रमाणात ओला असेल त्या झाडाजवळ ड्रीपर्स उघडून पाहावे व स्वच्छ ठेवावे. ४) ड्रिपर्स चा प्रवाह दर ठराविक दाबावर अपेक्षित प्रवाह दरापेक्षा कमी आढळून आल्यास ड्रीपर्स उघडून स्वच्छ करावे. ५) ड्रीपर्स ची छिद्रे पाण्यातील जिवाणू सूक्ष्मजीव तंतू व शेवाळामुळे बंद पडू नये म्हणून ठिबक सिंचन संचास पंधरा दिवसांच्या किंवा महिन्याच्या अंतराने क्लोरीन प्रक्रिया द्यावी.

हंगाम संपल्यानंतर ठिबक संच बंद करताना : १) मुख्य नळी, उपनळी, लॅटरलर्स स्वच्छ कराव्यात. २) गाळणी यंत्र स्वच्छ पाण्याने साफ करावे, वाळूचे गाळणी यंत्र उघडून त्यातील वाळू सुकू द्यावी. ३) संचा सोबत खते देण्याची टाकी असल्यास ती स्वच्छ करावी. ४) ठिबक सिंचन संच वापरात नसताना लॅटरलर्स काढून ठेवायच्या असल्यास यांचा गोल गुंडाळी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावी. ५) ठिबक सिंचन संच बंद असताना नादुरुस्ती असलेले घटक उदा. नळ्या, व्हॉल्व्ह इ. दुरुस्त करायला ठिबक सिंचन संचास बंद करण्यापूर्वी आम्ल व क्लोरिन प्रक्रिया देणे अधिक चांगले असते.




## महत्वाच्या घटना

१५६७ : स्कॉटलंडची राणी मेरी पदच्युत झाल्यामुळे १ वर्षाचा जेम्स (सहावा) स्कॉटलंडच्या राजेपदी विराजमान झाला.
१७०४ : ब्रिटनने जिब्राल्टरचा ताबा घेतला, जो आजपर्यंत सोडलेला नाही.
१८२३ : चिलीमधे गुलामगिरीची प्रथा समाप्त झाली.
१८७० : अमेरिकेमध्ये देशांतर्गत रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
१९३१ : पिटसबर्ग, पेनसिल्व्हानिया येथील एका वृद्धाश्रमास आग लागुन ४८ लोक मृत्यूमुखी पडले.
१९३२ : रामकृष्ण मिशन मठाची स्थापना करण्यात आली.
१९४३ : दुसरे महायुद्ध ऑपरेशन गोमोरा दोस्त राष्ट्रांनी जर्मनीतील हॅम्बर्ग शहरावर तुफानी बॉम्बहल्ले सुरू केले. हे हल्ले पुढील आठ दिवस सुरू होते. या हल्ल्यांना हॅम्बर्गचे हिरोशिमा असे म्हणण्यात येते.
१९६९ : सफल मानवी चांद्रमोहिमेनंतर अपोलो ११ हे अंतराळयान पॅसिफिक समुद्रात सुखरूप उतरले.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की राष्ट्राध्यक्ष रिर्चड निक्सनने स्वत:विरुद्धचा पुरावा अवैधरीत्या दडवून ठेवला होता.
१९९० : इराकने कुवेतच्या सीमेजवळ सैन्याची जमवाजमव करण्यास सुरूवात केली.
१९९१ : अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणांचा पाया घालणारा? अर्थसंकल्प संसदेत सादर केला.
१९९७ : ख्यातनाम बंगाली लेखिका महाश्वेतादेवी यांना पत्रकारिता, साहित्य व कला या क्षेत्रातील कामगिरीसाठी 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९७ : माजी हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा आणि स्वातंत्र्यसैनिक अरुणा असफ अली यांना स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान
१९९८ : परकीय चलन नियमन कायद्याच्या जागी परकीय चलन व्यवस्थापन कायदा जारी करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय
२००० : विप्रो आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ स्पर्धेत चेन्नईच्या विजयालक्ष्मी सुब्रह्मण्यम हिने भारताच्याच पी. हरिकृष्णला बरोबरीत रोखल्यामुळे तिला अर्धा गुण मिळाला त्यामुळे तिच्या ग्रँडमास्टर या किताबावर शिक्कामोर्तब झाले व ती भारताची पहिला महिला ग्रँडमास्टर बनली.
२००१ : जपानमधील टोकियो येथे झालेल्या जागतिक जलतरण स्पर्धेत भारताच्या शिखा टंडनने फ्रीस्टाईल प्रकारात १०० मीटर अंतर ५९.९६ सेकंदात पार केले. ही शर्यत एक मिनिटापेक्षा कमी वेळात पूर्ण करणारी ती भारताची सर्वात लहान खेळाडू आहे.
२००४ : इटली देशाने भारतीय पर्यटकांसाठी सात नवीन वीजा कॉल सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला.
२००५ : लान्स आर्मस्ट्राँगने 'टूर-डी-फ्रान्स' ही सायकल शर्यत सलग सातव्यांदा जिंकली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८६ : फ्रेंच गणितज्ञ संशोधक जोसेफ निकोलेट यांचा जन्म.
१८०२ : फ्रेंच लेखक अलेक्झांड्रे ड्युमास यांचा जन्मदिन.
१८५१ : जर्मन गणितज्ञ फ्रेडरिक शॉटकी यांचा जन्म.
१९११ : गोविंदभाई श्रॉफ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील झुंजार स्वातंत्र्य सेनानी (मृत्यू:)
१९११ : अमल ज्योती तथा 'पन्नालाल' घोष बासरीवादक व संगीतकार (मृत्यू: २० एप्रिल १९६०)
१९२४ : प्रसिद्ध भारतीय गजल गायक व उर्दू शायर(कवी) नाज़िश प्रतापगढ़ी यांचा जन्मदिन.
१९२८ : केशुभाई पटेल गुजरातचे मुख्यमंत्री आणि राज्यसभा सदस्य
१९३७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक मनोज कुमार यांचा जन्म.
१९४५ : अझीम प्रेमजी दानशूर व्यक्ति आणि 'विप्रो'चे चेअरमन
१९४७ : जहीर अब्बास पाकिस्तानी फलंदाज
१९६९ : जेनिफर लोपेझ अमेरिकन अभिनेत्री, गायिका आणि नर्तिका
१९८५ : पद्मश्री, पद्मभूषण, राजीव गांधी खेलरत्न, पुरस्कार विजेता उत्कृष्ट भारतीय बिलियर्ड्स आणि स्नूकर खेळाडू पंकज अडवाणी यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११२९ : शिराकावा जपानी सम्राट (जन्म: ७ जुलै १०५३)
१९७० : भारतीय उद्योगपती पीटर दि नरोन्हा यांचे निधन. (जन्म: १९ एप्रिल १८९७)
१९७४ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (जन्म: २० आक्टोबर १८९१)
१९८० : अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (जन्म: ३ सप्टेंबर १९२७)
१९८० : पीटर सेलर्स इंग्लिश विनोदी अभिनेता आणि गायक (जन्म: ८ सप्टेंबर १९२५)
२०१२ : सीटी स्कॅन चे शोधक रॉबर्ट लिडले यांचे निधन. (जन्म: २८ जुन १९२६)
२०१८ : माजी ब्रिटीश अष्टपैलू क्रिकेटपटू जॉन मुरे यांचे निधन.

# परतुर,मंठा तालुक्यात ढगफुटी: अतिवृष्टीने हजारो हेक्टर शेती मालासह वाहून गेली

जालना । प्रतिनिधी

२१ जुलै रोजी रात्री परतूर तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या शेलगाव, अंगलगाव, हनुवाडी आणि मंठा तालुक्यातील सरहद, वडगाव, बेलोरा, नायगाव या गावांतील शेतीला मुसळधार पावसामुळे आणि ढगफुटीसदृश अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेची गंभीरता लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने या गावांचा दौरा करून नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांनी शासन स्तरावरून तात्काळ मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले की, त्यांनी जालना जिल्हाधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासोबतच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या घटनेची संपूर्ण माहिती कळवण्यात आली आहे. लोणीकर यांनी पुढे नमूद केले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, आणि या परिस्थितीत



शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक आणि अन्य मदत मिळावी यासाठी ते शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, पंचनाम्याच्या आधारे नुकसान भरपाईची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. बबनराव लोणीकर यांनी या घटनेनंतर तातडीने पाहणी करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण होण्यास मदत झाली. त्यांनी जिल्हा प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना देऊन आणि मुख्यमंत्र्यांपर्यंत ही बाब पोहोचवून शेतकऱ्यांच्या हितासाठी पुढाकार घेतला आहे. यापूर्वीही लोणीकर यांनी परतूर मतदारसंघात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देताना दिसून आले आहे, जसे की रस्ते, पाणीपुरवठा, आणि शेतीसंबंधी पायाभूत सुविधा यांसाठी त्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे.

शासनाची भूमिका आणि अपेक्षा: महाराष्ट्र शासनाने यापूर्वी अतिवृष्टी आणि पूर यांसारख्या आपत्तींसाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी विविध योजना लागू केल्या आहेत. उदाहरणार्थ, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी () आणि राज्य आपत्ती निवारण निधी () अंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाते. तथापि, ही मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची कार्यक्षमता आणि पारदर्शकता महत्त्वाची आहे. लोणीकर यांनी मुख्यमंत्र्यांशी केलेल्या संवादामुळे या प्रकरणात जलद कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन प्रशासन आणि शासन यांच्याशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळण्याची आशा आहे. तथापि, ही प्रक्रिया जलद आणि पारदर्शकपणे पार पडणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान कमी होऊ शकेल. शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने परतूर आणि मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांना या संकटातून सावरण्यासाठी योग्य ती मदत मिळेल, अशी अपेक्षा आहे. या दौऱ्या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांच्या सोबत परतूर तहसीलदार प्रतिभा गोरे, उप विभागीय कृषी अधिकारी राम मंठा तहसीलदार कल्याण काळदाते, तालुका कृषी अधिकारी वाघमोडे यांच्या सह प्रशासनातील नायब तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी या बरोबर मंठा भाजपा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, यांची उपस्थिती होती.

# पीक कर्जवाटपास खाजगी बँकांची टाळाटाळ

## अजितदादांनी हिसका दाखवावा! सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत, खाजगी व सहकारी अशा १९ बँकांच्या २१७ शाखा कार्यरत आहेत. खरीप हंगामासाठी या बँकांना १,४४० कोटी रुपयांचे पीककर्ज उद्दिष्ट दिले गेले आहे. मात्र जुलै अखेर आला तरी केवळ ८१५ कोटी ४५ लाख रुपयांचेच कर्जवाटप झाले असून आतापर्यंत ९५,९५५ शेतकऱ्यांना फक्त ५७ टक्केच कर्ज मिळाले आहे मे महिन्यात जिल्ह्यात पावसाचे चांगले आगमन झाले. अधूनमधून झालेल्या पावसामुळे ९९ टक्क्यांहून अधिक पेरणी झाली असली तरी बँकांनी शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास आखडत हात घेतला आहे. जिल्ह्यातील दोन बँकांनी अद्याप एकाही शेतकऱ्याला कर्ज दिलेले नाही, तर तीन बँकांनी केवळ २० शेतकऱ्यांपर्यंतच वाटप मर्यादित ठेवले आहे. दोन महिन्यांत उर्वरित ४३ टक्के कर्जवाटप करणे हे बँकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

खाजगी बँकांकडून शासनाच्या आदेशांकडे आणि प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष होत असून, शेतकरी वर्गाची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी अशा बँकांना तात्काळ धडा शिकवावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

यासाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. अक्सिस बँकेला ३५ कोटी व कोटक महिंद्रा बँकेला ३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले असतानाही या दोन्ही बँकांनी एकाही शेतकऱ्याला पीककर्ज दिलेले नाही. एचडीएफसी बँकेला १८ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यांनी ११ कोटी ९० लाख रुपयांचे कर्जवाटप (६६ %) केले आहे. आरपीएल बँकेने केवळ ६ कर्जदारांना ९३ लाख रुपयांचेच पीककर्ज दिले आहे.

आयसीआयसीआय बँकेने कळविलेला आकडा हा इतर प्रकारच्या कर्जाचा असून तो शेतकरी कर्जवाटपात दाखवून शासनाची दिशाभूल केल्याचे उघड झाले आहे. याउलट जिल्हा बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आदींनी चांगले कर्जवाटप केले आहे. मात्र खाजगी बँकांच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी त्रस्त आहेत.

# अजित पवारांनी कल्याणकारी योजना राबविल्या–आ. विक्रम काळे



जालना। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा ना.अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना , शेतीसाठी मोफत वीज, मुलींना मोफत शिक्षण, महात्मा फुले जन आरोग्य योजना मध्ये रुपये पाच लाखापर्यंत वाढ आदी समाजातील विविध घटकासाठी कल्याणकारी योजना करिता अर्थसंकल्पात तरतूद करून त्याचा लाभ मिळवून दिल्याचे आमदार विक्रम काळे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त धारकल्याण तालुका जालना येथील सदानंद महाराज मठ येथे स्व. बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व श्री गणपती नेत्रालय, जालना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जालना यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी, उपचार व चष्मेवाटप शिबिराचे उद्घाटन प्रसंगी आमदार काळे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम, रवींद्र तौर,युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील, माजी जि प सदस्या पुष्पाताई चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर , शहर कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण व शरदचंद्र पवार यांचा सहवास लाभलेले अजितदादा पवार यांच्या रूपाने एक दूरदृष्टी असलेले विकासाभिमुख नेतृत्व महाराष्ट्राला लाभलेले आहे. समाजातील सर्व जाती-धर्मातील घटकांना न्याय देणारे व धर्मनिरपेक्ष वृत्तीने काम करणारे नेते असल्याने येणाऱ्या काळात त्यांना मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळावी अशी सामान्य जनतेची भावना असल्याचे ते म्हणाले.

आपण वाढदिवस व इतर प्रसंगी गरजवंतांना मदत करण्याच्या मानवतावादी दृष्टिकोनातून नेहमीच समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करीत असून त्यामध्ये कोरोना काळात आयुर्वेदिक औषधी वाटप , धान्य किट, मास्क, सॅनिटायझर वाटप, रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी शिबिर, शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण आदीं कार्यक्रमाचे नेहमीच आयोजन करत असतो . याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम व रवींद्र तौर यांनीही मनोगत व्यक्त केले तर प्रदेश युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. या शिबिरात ९९५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून २५५ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे त्यांच्यावर श्री गणपती नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. कार्यक्रमास सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे , डॉ. सुखदेव मांटे, तालुका अध्यक्ष कैलास मदन, विधानसभा अध्यक्ष प्रताप शिंदे, शहर महिला जिल्हाध्यक्ष रिंकल तायड,संगीता नागरगोजे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी , कार्यकर्ते व रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्राचार्य सिद्दीकी नवीद यांचा मिल्लिया महाविद्यालयात विशेष सत्कार

## क्रांतिकारी शिक्षक संघटनेकडून गौरवपूर्ण सेवापुर्ती सोहळा संपन्न

बीड। प्रतिनिधी

क्रांतिकारी शिक्षक संघटना, महाराष्ट्र तर्फे मिल्लिया महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सेवानिवृत्त प्राचार्य सिद्दीकी नवीद यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा क्रांतिकारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शाहेद कादरी आणि कार्यक्रमाचे उद्घाटक बीड विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार, मॅफ्कोचे माजी अध्यक्ष सय्यद सलीम यांच्या हस्ते नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य सिद्दीकी नवीद यांना शॉल, सन्मानपत्र आणि रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच याच कार्यक्रमात संघटनेकडून इयत्ता दहावी व बारावीच्या ६० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शिक्षक वृंद, पालक व पाहूणे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सिद्दिकी नवीद यांनी शिक्षण क्षेत्रात सहशिक्षक पदावरून सुरुवात करत आपल्यातील गुणवत्तेने प्राचार्य पदापर्यंत मारलेली मजल निश्चितच वाखाणण्याजोगी आणि विद्यार्थ्यांना आदर्श देणारी आहे असे म्हटले.

सेवानिवृत्त प्राचार्य सिद्दिकी नवीद हे सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. याबद्दल त्यांनी कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना सर्वांकडून मिळत असलेल्या प्रेम व सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले.



# मंदाकिनी गंगाधरराव कुलकर्णी यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रहिवासी सौ. मंदाकिनी गंगाधरराव कुलकर्णी (केसापूरी परभणीकर) यांचे मंगळवारी दुपारी निधन झाले. त्या ६५ वर्षांच्या होत्या.



मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. बीड येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सेवाश्रम प्रकल्पाच्या संचालिका, सामाजिक कार्यकर्त्या मयूरी राजहंस यांच्या त्या आई होत.

# जॉन ग्रेगर मेंडेल यांचे कार्य संशोधकांना सदैव प्रेरणादायी–प्रा. जिगे

जालना। प्रतिनिधी

जॉन ग्रेगर मेंडेल यांचे कार्य संसोधकांना सदैव प्रेरणादायी असून त्यांनी केलेल्या संसोधनातून नवीन बियाणे उत्पादनास चालना मिळाली असून मेंडेल यांनी परिस्थितीवर मात करून निसर्ग सानिध्यात राहून विचार शक्तीने वाटाण्याच्या झाडाची निवड करून त्यातील विविध सात गुणधर्मावर आपले संशोधन केले. असे त्यांनी सांगितले सदरील कार्यक्रमाचे आयोजन जॉन ग्रेगर मेंडेल यांच्या जयंती निमित्त संत रामदास महाविद्यालयात विज्ञान मंचच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र परदेशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, याचप्रमाणे उपप्राचार्य डॉ. गजानन अवचार, विज्ञान मंचचे अध्यक्ष डॉ. विजय सूर्यवंशी व गणित दिनाचे व्याख्याते डॉ. बद्रीनाथ घोंगे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. माधव गुट्टे यांनी मानले.




प्रमुख व्याख्यात्ये म्हणून प्रा संदीप जिगे यांनी ग्रेगर मेंडेल यांच्या संपूर्ण जीवनावर प्रकाश टाकला. या नंतर डॉ. घोंगे यांनी गणित दिवसानिमित्त पाय साईन वर आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. परदेशी यांनी सांगितले कि मेंडेल यांनी मानवी जीवन उंचवण्याकरिता जे संसोधन कार्य केले ते आजही अनेक वर्षांपासून अस्तित्वात असून त्याच्या संसोधनाच्या आधारावर आज बियाणे उद्योग व जैवतंत्रज्ञान आधारित अनेक उद्योग कार्यरत असून अर्थव्यवस्थेस हातभार लावत आहे. सदरील कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. दिनेश खराटे, डॉ. सुभाष पवार, डॉ. दिलीप सपाटे, डॉ. संदीपसिंह गौर, डॉ. सुबकडे, श्री सुनील हिवाळे आदीने परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तेर कर्मचारी उपस्थित होते.

# पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक–जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

जालना । प्रतिनिधी

**आजच्या स्पर्धेच्या युगात पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा आपल्या दैनंदिन कामकाजात उपयोग करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले. महसुल सभागृहात जिल्हास्तरीय पत्रकार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ हे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम. पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार तर प्रमुख मार्गदर्शक जालना येथील शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे संगणक विभागाचे वरिष्ठ श्रेणी प्राध्यापक प्रा. संदिप काळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील (संगायो) विभागाच्या तहसिलदार श्रीमती प्रणाली तायडे आणि जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.**



यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, आज प्रत्येक क्षेत्रात एआयचा मोठ्या प्रमणात वापर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे पत्रकारांनी देखील नवीन येणारे तंत्रज्ञान आत्मसात करणे ही आज काळाची गरज बनली आहे. प्रत्येकाला आज बातमी लवकरात-लवकर हवी असते. परंतू कोणतीही बातमी प्रसिध्द करण्यापुर्वी पत्रकारांना त्याची सत्यता देखील पडताळून पाहणे आवश्यक आहे. आज मोबाईल आणि एआयच्या युगामध्ये प्रत्येकाकडे बातमी असून, प्रत्येक व्यक्ती हा बातमीचा कन्टेंट तयार करु शकतो. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापर करणे आवश्यक आहे. माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजीत पत्रकार कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. संदीप काळे यांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारीता, सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. तर तहसिलदार (संगायो) श्रीमती प्रणाली तायडे यांनी ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर पत्रकारांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. प्रा. काळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पत्रकारीतेमध्ये कशा पध्दतीने वापर करावा. तसेच सायबर सुरक्षा, डिपफेक, व्हिडिओ एडिटींग करणे, व्हिडिओ-ऑडीओ मजकूर रुपांतरीत करणे, भाषांतर, सादरीकरण तयार करणे, विविध अहवाल तयार करणे, ग्राफिक्स डिझाईन, विविध भाषेचा योग्य वापर आणि सायबर सुरक्षा आदी बाबत यावेळी मार्गदर्शन केले. तसेच तहसिलदार प्रणाली तायडे ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये आपणास विविध ताण-तणावांना सामोरे जावे लागते. बदलते कामाचे स्वरूप, बदलती कुटूंब रचना, समाजामध्ये वावरण्याचे बदलेले नियम आणि सोशल मिडिया या सर्वांचा परिणाम आपल्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर होत आहेत. या वाढत्या ताण-तणावावर आपण नियंत्रण आणणे आवश्यक आहे. त्यासाठी ताण-तणावांचे योग्य व्यवस्थापन करुन आपल्या जीवनशैलीत योग्य बदल घडविल्यास आयुष्य आनंदाने जगता येते. जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी यावेळी माहिती जनसंपर्क महासंचालनालय विभागामार्फत पत्रकारांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. यामध्ये अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या योजनेचे पात्रता, निकष आणि आवश्यक कागदपत्रे याविषयी माहिती दिली. कार्यशाळेचे प्रास्ताविक जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी केले. तर मिलींद तुपसमिंद्रे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तसेच उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातील विष्णु जायभाये, संतोष पाखरे, श्रीमती प्रतिभा इंगळे, ज्ञानोबा पांचाळ यांनी सहकार्य केले. यावेळी कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व पत्रकार, वृत्तपत्र प्रतिनिधी, संपादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची तंत्रज्ञपदी निवड

बीड । प्रतिनिधी

म शि.प्र मंडळ संचालित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन हे विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्यासाठी नेहमीच अग्रगण्य स्थानी आहे त्यामधमातून महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी हे आतापर्यंत शासकीय व निमशासकीय तसेच राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये कार्यरत आहेत.त्यातच इलेक्ट्रिकल शाखेमधील उत्तीर्ण विद्यार्थी विशाल विजयकुमार जायभाये याची तंत्रज्ञ पदासाठी निवड झाली आहे.न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड ही भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आहे त्यामध्ये अणुऊर्जेपासून वीज निर्मितीसाठी केली जाते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थ्यांना चांगला रोजगार मिळवा यासाठी प्रयत्नशील असते प्रत्येक विभागांतर्गत आम्ही प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या थेयरी सोबत शाखेचे पूर्ण प्रॅक्टिकल ज्ञान मिळावे



या उद्देशाने औद्योगिक भेटी, तज्ञांचे मार्गदर्शन, डी.आय.वाय इत्यादी उपक्रम राबविले जातात. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा.मोरे डी.एन, प्रा.शिनगारे एस. टी, प्रा.राऊत टी.के,प्रा.कुलकर्णी एस.एस,प्रा. बहिर एस.एस आणि सर्व विभागाचे विभागप्रमुख,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सुधारित पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

## शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे कृषि अधीक्षकांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यास आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातप्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम पिके ज्वारी, बाजरी, मका, तूर,मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना खरी पहंगाम २०२५ साठी सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजनेत ३१ जुलै, २०२५ पर्यंत सहभाग घेता येणार आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे यांनी सांगितले आहे.

प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप हंगाम २०२५साठी पिकांसाठी असलेली प्रती हेक्टर विमा संरक्षित रक्कम व शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्त्याची प्रती हेक्टर र क्कम पुढीलप्रमाणे आहे.ज्वारी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ३३ हजार रूपये असून शेतकऱ्याने प्रती हेक्टर ६६०रूपये भरावयाची आहे. याचप्रमाणे बाजरी पिकासाठी विमासंरक्षि तर क्कम ३० हजाररू.तर शेतकऱ्याने भरावयाची रक्कम ६०० रूपये, भुईमूग विमासंरक्षित रक्कम ४५ हजाररू. व शेतकरी हिस्सा ९०० रूपये, सोयाबीन विमासंरक्षित रक्कम ५८ हजार रूपये व शेतकरी हिस्सा १ हजार १६० रू., मूगपिकासाठी विमासंरक्षित रक्कम २५ हजार व शेतकरी हिस्सा ५०० रू., उडीद पिकासाठी विमासंरक्षित रक्कम




२५ हजार रू. व शेतकरी हिस्सा ५०० रू., तूरपिकासाठी विमासंरक्षित रक्कम ४५ हजार रू. व शेतकरी हिस्सा ९०० रू., कापूस विमासंरक्षित रक्कम ६० हजार रू. शेतकरी हिस्सा १ हजार ८००रू., मका विमासंरक्षित रक्कम३६ हजार रू. व शेतकरी हिस्सा ७२० रू. आणि कांदा पिकासाठी विमासंरक्षित रक्कम ६८ हजार रू. व शेतकऱ्यांनी भरावयाची रक्कम ३ हजार ४०० रू.याप्रमाणेआहे.

महत्त्वाच्याबाबी

या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा नोंदणी क्रमांक आणि ईपीक पाहणी बंधनकारक आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके सर्वशेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे. ई-पीक पाहणी आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल आणि भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल.केंद्रशासनाने विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी ४० रुपये मानधन निर्धारित केल्याप्रमाणे संबंधित विमा कंपनीमार्फत सीएससी विभागास दिलेजाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालकांना देऊनये.मंजूर नुकसान भरपाई अर्जदाराच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्रशासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमायोजने चा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढीलकिमान ५वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही, याची नोंद घेण्याचेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी कळविलेआहे.कर्जदार शेतकऱ्यांस योजनेत सहभागी होण्याचे बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने योजनेच्या अंतिम तारखेच्या सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरण्याबाबत लेखी कळविणे आवश्यक आहे. तर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला नोंदणी क्रमांक (फार्मरआडी), सातबारा उतारा, बँकपासबुक, आधरकार्ड व पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून व हप्ता भरून सहभाग घ्यावा. विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी कॉमन सर्विस सेंटर () आपले सरकार पोर्टल किंवा ... या पोर्टलचे सहाय्य

## पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची तलवाडा पोलीस ठाण्याला भेट

तलवाडा । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तलवाडा पोलिस स्टेशन येथे व्हिजिट देवून पोलिस स्टेशन कामकाजाचा आढावा घेतला.यावेळी रेकॉर्ड तपासणी,गुन्ह्याच्या संदर्भात माहिती घेऊन गुन्हे निकाली काढावे, जप्त मालाची पाहाणी केली,तपासा जलदगतीने करण्यात यावेत अशा सूचना दिल्या.



गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन येथे आज रोजी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेटी दरम्यान पोलिस स्टेशनची येथील सर्व पाहाणी केली व कामकाचा आठावा घेतला अनेक गुन्ह्याच्या संदर्भात माहिती घेऊन पोलिस स्टेशन ची पाहणी केली.या वेळी गंगावाडी येथील शिवम चिकने खून प्रकरणी गंगावाडी येथील नातेवाईकांनी पोलिस

पान ३ वर



**बीड : बिंदुसरा नदीच्या तीरावर असलेल्या संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याणराव आखाडे, दिलीपराव गोरे, नवनाथ अण्णा शिराळे ,अरुण नाना डाके, साखरे ,विश्वस्त गणपतराव दुधाळ ,बाबुराव दुधाळ, गोरे, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, प्रा. रणजीत आखाडे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत आदींनी अभिवादन केले. यावेळी संत सावता महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.**

## लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका स्तरीय शैक्षणिक स्पर्धा सप्ताहाचे आयोजन-रामदास बडे

रायमोहा । प्रतिनिधी

लोकनेत्या तथा महाराष्ट्र राज्याच्या कर्तबगार महिला मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त तालुकास्तरीय शैक्षणिक स्पर्धेचे आयोजन पिंपळनेर जिल्हा परिषद गटाचे सदस्य रामदास नाना बडे यांनी केले आहे या स्पर्धेचे उदघाटन जिल्हा परिषद शाळा दहीफळे वस्ती येथून बीड जिल्ह्याच्या माजी खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते २५ जुलै रोजी आनलाईन प्रणालीव्दावारे करण्यात येणार आहे या स्पर्धेमध्ये वकृत्व स्पर्धा महाराष्ट्राचे सक्षम नेतृत्व मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ,वृक्ष आणि पर्यावरण,छंद माझा वाचनाचा निबंध स्पर्धा शेतक-



यांच्या जीवनातील दुभत्या जनावराचे महत्व,निसर्ग आपला मित्र,मी वाचलेले पुस्तक,चित्रकला स्पर्धा निसर्ग चित्र,वृक्ष लागवड करणारी मुले,रांगोळी स्पर्धाकाच्या इच्छेनुसार इत्यादी विषय विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय शैक्षणिक स्पर्धेत असणार आहेत तर या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण १ आगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हा परिषद शाळा शिरूर कासार येथे भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे अशी माहिती तालुकास्तरीय शैक्षणिक स्पर्धेचे आयोजक पिंपळनेर जिल्हा परिषद गटाचे सदस्य रामदास नाना बडे यांनी दिली आहे

## प्रपंच करून परमार्थ साधता येतो हा संदेश सावता महाराज देतात-ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज

बीड । प्रतिनिधी

नेटका प्रपंच करून देखील परमार्थ साधता येतो.माणसाला चांगलं जीवन जगण्यासाठी फार काही पैसा लागतो असे नाही. पैसा हे साध्य नसून साधन आहे सामान्य जीवन जगून देखील देखील परमार्थ साधता येतो, ही शिकवण कर्मयोगी श्री संत सावता महाराज देतातअसे उद्गार गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नाव नोंदणीत झालेले सुप्रसिद्ध कीर्तनकार ह .भ .प. रामकृष्ण रंधवे महाराज यांनी प्रतिपादन केले.

बीड येथील नव्याने उभा राहिलेल्या श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात सावता महाराजांची



पुण्यतिथी साजरी झाली त्यावेळी ह.भ. प. रंधवे महाराजांचे कीर्तन (ता. २३)झाले. प्रपंच असून परमार्थ साधावा वाचे आळवावा पांडुरंग

उच नीच काही न पाहे सर्वथा पुराणच्या कथा पुराणीच या अभंगावर त्यांनी निरुपण केले.

देवसेवा,देशसेवा आणि समाजसेवा केल्याने माण साला देव पण मिळते. संतांनी जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी देव पाहिला.आपल्याला माणसात देखील देव दिसत नाही. तो कधी माहित नाही.पण सावता महाराजांचे चरित्रातून कष्ट करणारी पिढी निर्माण होऊ शकते. केवळ तप,यज्ञ,याग, यांचा त्याग करून आपले कर्तव्य पार पाडत असताना शुद्ध अंतकरणातून केलेले नामस्मरण हे तुम्हाला प्रचंड आत्मिक समा धान देते.शेवटी देव म्हणजे समाधान, देव म्हणजे आनंद!! अशी देवाची सोपी व्याख्या सावता बाबा करतात. शेतीतून उत्पादित झालेल्या कांदा लसूण मिरची मध्ये देव पाहिला मोट,नाडा विहिरीत देव पाहिला आनंदाने कष्ट केले की सुख मिळते हे सुख म्हणजेच देव आहे असे सावता बाबा सिद्धांत सांगतात. सुखी समाधानी

पान ३ वर

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रम

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री, जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शहर भाजपच्यावतीने सामाजिक सेवा उपक्रम सप्ताहा अंतर्गत आज परळी शहरात रस्त्यावर भाजीपाला विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी छत्री वाटप, नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप, आश्रम शाळा व बिलाल उर्दू प्राथमिक शाळेत वह्यांचे वाटप करणयात आले.

पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते



*** भाजीपाला विक्रेत्यांना छत्री, पर्यावरणपूरक कापडी पिशव्या वाटप* आश्रम शाळा व बिलाल उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना वही वाटप**

२६ जुलै दरम्यान शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज बुधवार दि. २३ जुलै रोजी ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात भाजीपाला विक्रेत्यांना छत्री वाटप व पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप जेष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, जेष्ठ नेते शांतीलाल जैन, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, डॉ. शालिनीताई कराड, जेष्ठ नेते श्रीराम मुंडे, प्रकाश जोशी उपस्थित होते. यावेळी बोलताना जुगलकिशोर लोहिया यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप शहराध्यक्षा उमाकाकू समशेट्टे यांनी शहर

पान ३ वर

## गॅरेज चालकाला धमकी देत फोनपेवरून जबरदस्तीने ८४ हजारांची रक्कम उकळली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील राजीव गांधी चौकात गॅरेज चालवणारे सोमनाथ मदन ढगे यांच्याकडून जबरदस्तीने मोबाईलमधून पैसे ट्रान्सफर करून घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना मंगळवारी दुपारी घडली असून दोघांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सोमनाथ ढगे यांच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (दि. २२) दुपारी चारच्या सुमारास ते स्वतःच्या गॅरेजवर काम करत असताना, त्यांच्या ओळखीचा अविनाश देवकर हा तिथे गाडी दुरुस्तीसाठी आला. गाडीत काहीतरी अडचण असल्याचे सांगून त्याने गाडी चालवून पाहण्यास सांगितले आणि स्वतः पाठीमागे बसला. योगेश्वरी नगरीपर्यंत आल्यानंतर अविनाशचा मित्र अजहर अब्दुलरहेमान पठाण तेथे उभा असल्याचे दिसून आला. त्यालाही मोटरसायकलवर बसवून हे तिघे पुढे गेले.योगेश्वरी नगरीच्या पुढे असलेल्या तळ्याजवळ त्याने मोटरसायकल थांबविली. याच दरम्यान, अविनाशने ढगे यांच्या खिशातून मोबाईल काढून घेतला आणि फोनपेचा पिन नंबर विचारला. सुरुवातीला चुकीचा पिन दिल्यावर अजहरने त्याला विश्वासात घेतल्याचा बहाणा करत दबाव आणला. त्यानंतर अविनाशने जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे भीतीपोटी ढगे यांनी खरा पिन नंबर दिला.पिन मिळाल्यानंतर त्यांनी ढगे यांच्या फोनपे अकाउंटमधून तीन व्यवहारातून एकूण ८४ हजार रुपये ट्रान्सफर करून घेतले. याबाबत कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देत ढगे यांना यशवंतराव चव्हाण चौकात सोडून ते दोघे पसार झाले.सदर फिर्यादीवरून अविनाश देवकर व अजहर अब्दुलरहेमान पठाण या दोघांविरुद्ध अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक आनंद शिंदे करत आहेत.

## गोदावरी नदीपात्रात छापेमारी २३ लाखांचा मुद्देमाल जप्त



बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातून मोठ्या प्रमाणात अवध्य वाळूची वाहतूक महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने होत असताना पोलीस निरीक्षक नवनीत कावत यांनी याची दखल घेत पहाटे काही पथक पाठवून गोदावरी पात्रात केलेल्या कारवाईत जवळपास २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आज दि २३ जुलै रोजी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास गेवराई पोलीस स्टेशन हद्दीमध्ये खामगावशिवारातील गोदावरी नदीपात्रात

पान ३ वर



**बीड : शहरातील बिंदुसरा काठावर असलेल्या संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी आमदार संदीप क्षीरसागर यांनी सावता महाराजांचे दर्शन घेऊन हरिभक्त परायण रणदिवे बापू महाराज यांच्या कीर्तनालाही हजेरी लावली. यावेळी संत सावता महाराज मंदिर विश्वस्त मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**

## आ. धस यांची कोरोना काळातील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

आष्टी । प्रतिनिधी

कोविड-१९ या साथ रोगाच्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये जमावबंदी प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आलेला असताना बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याच्या आरोपावरून आ.सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्याचा आज न्याय निर्णय होऊन आ.सुरेश धस यांचे सह सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे..



मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आमदार सुरेश धस यांनी यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर कार्यालयावर लाखोंच्या संख्येने मोर्चा आयोजित केला होता तात्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोविड-१९ चे निमित्त समोर करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याचे दाखवून आमदार सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. वास्तविक पाहता हा मराठा समाज आरक्षण विषयी असलेल्या सामाजिक मागणीसाठी लाखोंच्या उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात होता हा मोर्चा समाजहित डोळ्यासमोर ठेऊन हा मोर्चा काढण्यात आला होता. मराठा आरक्षणासाठी शासनाच्या विरोधात मोर्चा काढला म्हणून आमदार सुरेश धस आणि इतर संयोजक यांचे विरुद्ध कलम १८८,२७९,२८० भादवि सह कलम ५१(ब) तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम २,३,४ साथीचे रोग कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला. आ.सुरेश धस यांच्या सह..पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव, लोकनेते गोपीनाथ रावजी ऊस तोड कामगार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष

सुखदेव अप्पा सानप,जि.प सदस्य माऊली जरांगे, युवा नेते सचिन उबाळे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे प्रदेशाध्यक्ष यशवंत खंडागळे,शेख वसीम, लोकनेते गोपीनाथरावजी ऊसतोड कामगार संघटनेचे प्रदेश प्रवक्ते अभिजीत शेंडगे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा गांधले यांच्यावर हा खटला दाखल करण्यात आला होता. दि.२३ जुलै रोजी बीड न्यायालयाने आमदार सुरेश धस यांच्यासह मा.आ. लक्ष्मण पवार, मा.आ. आर.टी.देशमुख, राजेंद्र जाधव ,भारत जगताप,यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

आमदार

पान ३ वर

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेने केली अल्पवयीन पीडितेची सुटका



**बीड । प्रतिनिधी**

**बीडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेने पुण्यात जाऊन बीडच्या अल्पवयीन पीडित मुलीची सुटका केली या प्रकरणातील आरोपींनाही ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव आणि त्यांच्या टीमने केली.**

शिवाजीनगर बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ६६/२०२५ कलम १३७(२), १४३(२) हा दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दाखल झाला होता. सदर गुन्हा हा ०२/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग झाला. सदर गुन्ह्याच्या मूळ फाईलचे, तपास अधिकारी पल्लवी जाधव यांनी बारकाईने अवलोकन केले . त्यानंतर पीडित मुलीच्या आईची व भावाची त्यांच्या राहत्या घरी जावून भेट घेतली व त्यांच्याकडून गुन्ह्या संबंधाने माहिती मिळवली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १९/०७/२०२५ रोजी

पान ३ वर

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे, या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एखाद्या निष्पापाचा बळी गेल्यावर जागे होणार का ?
# देहूरोडच्या त्रस्त नागरिकांचा सवाल

**देहूगाव । प्रतिनिधी**

पुण्यामध्ये रस्त्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय असून यामुळे अनेकदा मोठे अपघात होताना दिसून येतात. देहूरोडवरील अशा प्रकारे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून यामुळे वाहन चालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. देहूरोड कॅन्टोमेंट बोर्डाच्या हद्दीमध्ये शिवाजी विद्यालया जवळील चौक हा वर्दळीचा चौक आहे. या मुख्य चौकाच्या मध्यभागीच मोठं मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे देहूकरांकडून रोष व्यक्त केला जात असून वाहनचालकांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.



देहूरोडवरील शिवाजी विद्यालयजवळील या चौकामध्ये झालेल्या मोठ्या खड्यांमध्ये पावसाचे गाळ मिश्रित पाणी साठले जाते. याच ठिकाणी पाण्याची पाईप लाईन अथवा गटारांची पाईप लाईन फुटली असल्यामुळे देखील सतत या भागात पाणी साचून गाळ मिश्रित चिखल निर्माण होत आहे. वाहन चालक, सायकलवरून प्रवास करणारे विध्यार्थी, विद्यार्थिनी, वाहन चालक आणि पादचारी जाणाऱ्यांना या खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज न आल्याने अपघात होत आहेत.अनेकजण जखमी झाले असून वाहने घसरुन अपघात होत आहेत. तर मामुर्डी, शीतळानगर कडून तसेच देहूरोड कडून पुणे बेंगलोर जुन्या महामार्गावर जाऊन मार्गाकडे जाणारी ,तसेच या महामार्गावरून देहूरोड शहर किंवा शीतळानगर, मामुर्डीकडे जाणारी वाहने शिवाजी विद्यालयाजवळी या खड्डे असलेल्या चौकात येतात.

राजकीय बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

त्या ठिकाणी खड्डे असल्याने वाहने मागे पुढे करून वाहनचालकांना कसरत करुन वाहने बाहेर काढावी लागतात. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून वाहनांचा एकमेकांना धक्का लागल्याने किरकोळ शाब्दिक वाद आणि शिवीगाळ होत आहे. अनेकदा संतप्त वाहनचालकांमध्ये हाणामाऱ्या होत असल्याचे देखील निदर्शनास येत आहे. यामुळे वाहनांचे देखील मोठे नुकसान होत असून वाहन चालकांची चिडचिड होत आहे. खड्डे वाचवणे अशक्य गोष्ट झाली आहे. खड्ड्यात गाड्या घातल्या शिवाय दुसरा पर्यायच नाही.

महाराष्ट्र संबंधित बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

देहूरोडमध्ये या ठिकाणी मोठे मोठे पडलेले खड्डे बुजवणे किंवा या ठिकाणी डांबरीकरण करावे, याबाबत कॅन्टोमेंट बोर्डाच्या मुख्याधिकारी,अधिकारी हे उदासीन असून ते बोर्डाच्या कार्यालयात किंवा पंख्याची हवा खात बसत आहेत. त्यांना देहूरोडमधील नागरी समस्यांचे काही घेणं देणं नाही. या ठिकाणी एखादा मोठा अपघात होऊन कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर देहूरोड कॅन्टोमेंट बोर्ड जागे होणार आहे का? असा प्रश्न त्रस्त झालेले देहूरोडचे ग्रामस्थ,वाहन चालक उपस्थित करू लागले आहेत. या ठिकाणी जर कोणाचा नाहक बळी गेला तर कॅन्टोमेंट बोर्डाला जबाबदार धरून मुख्याधिकारी , संबधित अधिकारी यांच्या विरुद्ध मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी देहूरोड देहूरोड शहर सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील असा इशारा स्थानिक नागरिक देऊ लागले आहेत.

## भारतात घुसखोरी! मुंबईला पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या ६ बांगलादेशी नागरिकांना ठोकल्या बेड्या

पुणे । प्रतिनिधी

भारतात घुसखोरी करुन अनधिकृतरीत्या राहणाऱ्या ६ बांगलादेशी नागरिकांना पिंपरी चिंचवड शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा क्रमांक चार पोलिस पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरात राहणारे काही बांगलादेशी नागरिक वाकड येथील भुजबळ चौक इथून मुंबईच्या दिशेने जाणार असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखा क्रमांक चार पोलीस पथकाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करत सहा बांगलादेशी नागरिकांना बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये मोहम्मद उस्मान शिराजून अली शेख वय ३४ वर्ष, अब्दुल्ला सागर मुल्ला वय २५ वर्ष, मोबीन हारून शेख वय ३९ वर्ष, जहागीर बिलाल मुल्ला वय ३५ वर्ष, मोहम्मद इलाहीन इलियास विश्वास वय २२ वर्ष आणि तोहीद मुसलेम हसन शेख वय २६ वर्ष अशी पोलिसांनी बेड्या ठोकलेल्या बांगलादेशी नागरिकांची नाव आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे हे बांगलादेशी नागरिक पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्यास होते. मात्र आता पोलिसांनी बांगलादेशी नागरिकांना बेड्या ठोकल्यानंतर त्यांचं बांगलादेशात यशस्वी प्रत्यारपण केला आहे. राज्यात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा गेल्या काही वर्षांपासून चर्चेत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक आढळून आले आहेत. त्या सर्व नागरिकांना पोलिस प्रशासनाने ताब्यात देखील घेतलं आहे.

## वडगावमध्ये डीजे बंदी; नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाईचा पोलिसांनी दिला इशारा

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

लवकरच गणेशोत्सव सुरु आहे. यामुळे वडगाव मावळमध्ये अतिशय स्त्युत्य निर्णय घेण्यात आली आहे. वडगाव मावळमध्ये डीजेवर बंदी लावण्यात आली आहे. गणेशोत्सव साजरा करतांना ध्वनी मर्यादा आणि शासन नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. यामुळे डीजेचा वापर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना करता येणार नाही. कोणीही डिजे लावून नियमभंग केला, तर कायदेशीर कारवाई केली जाईल,'' असा इशारा वडगाव मावळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी दिला आहे.

आगामी गणेशोत्सव, नियमावली, कायदा व सुव्यवस्था यासह सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर वडगाव मावळ पोलिस ठाण्याच्या व पत्रकार संघाच्या वतीने बुधवारी (ता.२३ ) वडगाव मावळ पोलीस ठाण्यात बैठक पार पडली. यावेळी पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त किरण भिलारे, सचिव अनंता कुडे, विश्वस्त भास्कर म्हाळस्कर, तुकाराम ढोरे, सुभाष जाधव, सुनिता कुडे, माजी सभापती गुलाब म्हाळसकर, मंगेश ढोरे, भाजपाचे शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर, नारायण ढोरे, विशाल वहिले, अतुल राऊत, उमेश ढोरे, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सुदेश गिरमे, ज्ञानेश्वर वाघमारे, संजय दंडेल, महादेव वाघमारे. सोमनाथ धोंगडे तसेच गणेश मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक कदम म्हणाले उत्सव काळात समाजविघातक शक्तींकडून घातपात घडवण्याच्या



शक्यता असतात. याकरता सर्व गणेश मंडळांनी परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पुढाकार घ्यावा. मंडळाच्या ठिकाणी मद्य प्राशन करणे, जुगार खेळणे असे प्रकार आढळल्यास मंडळाचे अध्यक्षासह पूर्ण कमिटीवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. डीजेला बंदी घालण्याच्या निर्णयानुसार गावातील सर्व मंडळांनी पोलीस प्रशासनाच्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव शांततेमध्ये व आदर्शवत पार पडावा असे आवाहन भास्कर म्हाळस्कर यांनी केले.


लोणावळ्यामध्ये दुकानांवर दरोडा

पर्यटनाची पंढरी समजलं जाणाऱ्या मावळ तालुक्यातला गेल्या काही महिन्यांपासून वाढलेली गुन्हेगारी पाहता, हत्या, दहशत, अपघात, महिलांवरील अत्याचार, जबरी चोरी आणि दरोड्याच्या घटनांनी मावळ हादरुन जात आहे. पोलिसांकडून संबंधितांवर कारवाई देखील करण्यात येते. मात्र, पोलिसांच्या कारवाईवर समाधान होत नसल्याचे दिसून येते. कारण,मावळमधील गुन्हेगारीच्या घटना कमी होताना दिसून येत नाहीत. त्यातच,जुना मुंबई पुणे महामार्गावर लोणावळ्यातील चिक्की दुकानाला रविवारी पहाटेच्या सुमारास दोन अज्ञात तरुणांनी बंदूक टाकून लुटण्याची घटना उघडकीस आली आहे. रविवारी विकेंड असलेल्या दुकानदाराने पहाटेच दुकान उघडले होते त्यावेळी ग्राहक असल्याचे भाषण दोन तरुण दुकानात आले आणि कॅडबरी चॉकलेट मागितली दुकानात फारशी वर्धळ नसल्याचे पाहून त्यांनी अचानक दुकानदाराला मारहाण केली आणि बंदुकीचा धाक दाखवत गल्ल्यातील पैसे लुटून पसर झाले.

## लम्पी आजाराबाबत पुणे प्रशासन 'ॲक्शन मोड'वर; प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिल्या 'या' महत्त्वपूर्ण सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता लसीकरण मोहीम तसेच लम्पी रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले. जिल्ह्यामध्ये गोवंशीय जनावरांमध्ये लम्पी चर्मरोग या विषाणूजन्य आजाराचा प्रादुर्भाव दिसून आल्याने या रोगाचे नियंत्रण होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी डूडी बोलत होते.



जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये लम्पी चर्मरोगाने जनावरे आजारी असल्याने सध्या ९०६ जनावरांना या रोगाची बाधा झालेली आहे. यापैकी औषधोपचाराने ५९१ जनावरे बरी झाली असून, १५ जनावरे मयत झाली आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये ३०० जनावरांवर उपचार सुरू असून, दिवसेंदिवस रोगाचा प्रसार होऊन यामध्ये वाढ होताना दिसत आहे. जिल्ह्यातील शिरुर, आंबेगाव, जुन्नरमध्ये सर्वाधिक जनावरांना लम्पी चर्मरोग विषाणूची बाधा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ठिकाणी संसर्ग केंद्राच्या पाच किलोमीटर परिसरामध्ये लसीकरण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डूडी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

रोग नियंत्रणाच्या दृष्टीने मनुष्यबळ कमी आहे, अशा ठिकाणी जिल्ह्यातून किंवा तालुक्यातून इतर अधिकाऱ्यांची नियुक्त करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. लम्पी चर्म रोगाने आजारी जनावरांसाठी त्वरित औषधोपचार करण्यात येऊन रोगाचा इतरत्र फैलाव होऊ नये यासाठी गोठा स्वच्छता, जैवसुरक्षा व विविध निर्जंतुक औषधांची फवारणी करण्याचेही निर्देशही डूडी यांनी दिले.

उपचारानंतर अनेक जनावरे होताहेत बरी

सध्या जिल्ह्यात लम्पी चर्म रोगाचा सौम्य प्रादुर्भाव दिसून आला असून, उपचारानंतर बहुतांश जनावरे बरी होत आहेत. सर्व शासकीय संस्थांमध्ये लम्पी चर्मरोगावर उपचार करण्यासाठी आवश्यक औषध पुरवठा उपलब्ध आहे. मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतील ५, केंद्र पुरस्कृत योजनेतील १ फिरत्या पशुचिकित्सा पथकाद्वारे पशुपालकांच्या दारात उपचार करण्यात येत आहे. पशुपालकांनी लम्पी चर्मरोग बाधित पशुधनास उपचार करण्यासाठी १९६२ या विभागाच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

योग्य त्या जैवसुरक्षा उपाययोजनांची अंबलबजावणी, बाधित जनावरांचे तात्काळ व योग्य औषधोपचार केले आणि अबाधित क्षेत्रात १०० टक्के लसीकरण केले तर या रोगाचे प्रभावीपणे नियंत्रण करता येते. असे गेल्या दोन वर्षात निदर्शनास आले असून, त्यादृष्टीने सर्वांनी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

## पुण्यात पुन्हा हिट अँड रन प्रकरण; भरधाव कारने माय-लेकाला उडवले

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात अपघातांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दररोज अपघाताच्या घटना घडल्याचे दिवसून यत आहे. पुण्यातील विश्रांतवाडी परिसरातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात हिट अँड रनचा प्रकार समोर आला असून, एका भरधाव कारने दुचाकीस्वार माय-लेकांना धडक दिल्याची घटना घडली आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. तर आई जखमी झाली आहे.



मयूर रमेश पिंपळे (वय २८, रा. आनंदपार्क, भैरवनगर, धानोरी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. अपघातात मयूर याची आई गंभीर जखमी झाली आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस हवालदार जितेंद्र कांबळे यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार मयूर आणि त्याची आई हे आनंदपार्क परिसरातून १८ जुलै रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास निघाले होते. त्यावेळी भरधाव कारने यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार मयूर याला गंभीर दुखापत झाली, तसेच सहप्रवासी आई जखमी झाली. उपचारादरम्यान मयूर याचा मृत्यू झाला. अपघातानंतर कार चालक पसार झाला. पोलिसांनी कारचालकावर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान त्याची ओळख पटली असून, त्याचा शोध घेतला जात आहे. मयुर एका खासगी कंपनीत नोकरी करत होता. तो आईला घेऊन बाहेर जात असताना ही दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले अधिक तपास करत आहेत.

भरधाव कारच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

भरधाव कारच्या धडकेत एका सायकल चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पुणे स्टेशन परिसरात हा अपघात झाला आहे. याप्रकरणी पसार झालेल्या चालकावर बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. रामप्रतापसिंग महेसिंग राजावत (वय ५२, रा. भैय्यावाडी, ताडीवाला रस्ता) असे मृत्यू झालेल्या सायकल चालकाचे नाव आहे. याबाबत बिनीत सिंग (वय ४२, रा. वडाचीवाडी, उंड्री ) यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

सोलापूरजवळ मध्यरात्री भीषण अपघात

सोलापूर जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सोलापूरहून तडवळच्या दिशेने जाताना हत्तूर शिवारातील नाईकवाडी यांच्या शेताजवळ कार उलटून भीषण अपघात झाला आहे. या अपघातात कारखाली सापडून डॉक्टरचा मृत्यू झाला आहे. हा अपघात रविवारी मध्यरात्री झाला आहे. आशिष इरण्णा पनशेट्टी (वय ४०, रा. तडवळ, ता. अक्कलकोट) असे अपघातात मरण पावलेल्या डॉक्टरचे नाव आहे.

## पुणे पदवीधरची जागा राष्ट्रवादीलाच मिळायला हवी, मंत्री मुश्रीफांची मागणी, भाजपनंही केला दावा, कोणाला मिळणार संधी ?

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी पदवीधरच्या निवडणुकीमध्ये आपल्याच पक्षाला उमेदवारी मिळावी यासाठी शड्डू ठोकले जात आहेत.अनेक इच्छुक उमेदवारांनी तयारीलाही सुरुवात केली आहे.

राज्यातील सत्ता समीकरणामुळं पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे त्रांगडे निर्माण झाले आहे. आगामी पदवीधरच्या निवडणुकीमध्ये आपल्याच पक्षाला उमेदवारी मिळावी यासाठी शड्डू ठोकले जात आहेत. यापूर्वी भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी लढत होत असे. मात्र, अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यानं महायुतीकडून ही जागा कोणाला मिळणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पुणे पदवीधर आमदारकीच्या निवडणुकीला अजून दीड वर्ष बाकी आहेत. मात्र आतापासून आपल्या उमेदवाराचं नाव पुढे रेटण्याचा प्रयत्न करून सुरू झाला आहे. सध्या पुणे पदवीधरचे आमदार अरुण लाड (-ींप डरव) असून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून निवडून आले आहेत. त्यामुळं आता ही जागा राष्ट्रवादीलाच मिळायला हवी अशी मागणी मंत्री हसन मुश्रीफ (क्रीरप चींीहीळष ) यांनी केली आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघावर भाजपनं केला दावा




यापूर्वी पदवीधरची लढत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशीच झाली आहे. त्यामुळे भाजप ही जागा राष्ट्रवादीला सोडणार का हा खरा प्रश्न आहे. कारण पुणे पदवीधर मतदार संघामधून चंद्रकांतदादा पाटील हे दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे भाजपने देखील या मतदारसंघावर आपला दावा केला आहे.

राष्ट्रवादीकडून भैय्या माने यांच्या नावाची मागणी करणार, हसन मुश्रीफांची माहिती

दरम्यान, मंत्री हसन मुश्रीफ यांनी पुणे पदवीधर मतदारसंघावर दावा करत आपले निकटवर्ती भैय्या माने यांच्या नावाची घोषणा करुन टाकली आहे. आमदार अरुण लाड यांच्या विजयामध्ये भैय्या माने यांचा वाटा मोठा असून आम्ही अजित पवार यांच्याकडे भैया माने यांच्या उमेदवारीची मागणी करणार आहोत अशी माहिती हसन मुश्रीफ यांनी दिली आहे. त्यामुळं भैय्या माने यांनी देखील शिक्षण संस्थांच्या गाठीभेटी सुरू केल्या आहेत.

अरुण लाड यांनी आपल्या चिरंजीवांसाठी केली उमेदवारीची मागणी

दुसरं महत्त्वाचं म्हणजे अरुण लाड यांनी आपल्या चिरंजीवांसाठी उमेदवारीची मागणी केली आहे. जर उमेदवारी चिरंजीवाला मिळाली तर अजित पवार गटामध्ये जाण्यासंदर्भातील संकेत त्यांनी दिले आहेत. मात्र यावर कॅमेरासमोर बोलण्यास अरुण लाड यांनी मनाई केली आहे. पदवीधर निवडणुकीमध्ये उमेदवार पक्षीय नसावेत. या निवडणुकीतील उमेदवारी पक्षाने वाटून घेऊन नये. येणाऱ्या पदवीधर निवडणूकबाबत आमची अजून तयारी सुरू असल्याची माहिती अरुण लाड यांनी दिली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात आणि राष्ट्रवादीकडेच ही पदवीधरची उमेदवारी राहावी अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे.

पदवीधरच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक वेळी मतदाराची नोंदणी करून घ्यावी लागते. जो पक्ष अधिक नोंदणी करतो त्याच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडत असते. महायुतीमध्ये ज्या पद्धतीने उमेदवारी बाबत त्रांगडे निर्माण झाला आहे. तसेच महाविकास आघाडीमध्ये देखील अडचणी निर्माण झाल्या आहेत. राज्यात सत्ता समीकरणे बदलल्यामुळे महाविकास आघाडी अरुण लाड यांना उभा करणार की नवा उमेदवार शोधणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

## वाहनांची तोडफोड करणं भोवलं, पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गुन्हेगारी वाढत चालली असून, गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांकडूनही प्रयत्न केले जात आहेत. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. भवानी पेठेतील मंजुळाबाई चाळीत टोळक्याने दहशत माजवून वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी समर्थ पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. त्यांच्याबरोबर असलेल्या साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

जयेश सिद्धार्थ सोनवणे (वय २१), रितेश सिद्धार्थ सोनवणे (वय २३, दोघे रा. एसआरए वसाहत, मंजुळाबाई चाळ, भवानी पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी ५ जणांसह अल्पवयीनांवर समर्थ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार मंजुळाबाई चाळ भागातील एसआरए वसाहतीत राहायला आहेत. १८ जुलै रोजी मंजुळबाई चाळीत रात्री साडेदहाच्या सुमारास टोळक्याने दहशत माजविली. आरोपी सोनवणे आणि साथीदारांनी नागरिकांना शिवीगाळ केली. एसआरए वसाहतीच्या तळमजल्यावर लावलेल्या दुचाकी, तसेच रिक्षाची दांडक्याने तोडफोड केली. वसाहतीतील महिलांनी आरोपी सोनवणे आणि साथीदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपींनी वसाहतीतील महिलांना शिवीगाळ करुन मारहाणीची धमकी दिली. दहशत माजवून पसार झालेल्या आरोपी सोनवणे



यांना अटक केली. पसार झालेल्या साथीदारांचा शोध सूरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस उपनिरीक्षक नवनाथ कुल्लाळ अधिक तपास करत आहेत.

लोखंडी हत्याराने सपासप वार करून तरुणाला संपवल

कानाखाली मारल्याच्या रागातून १९ वर्षीय तरुणाचा लोखंडी धारदार हत्याराने वार करून खून करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही धक्कादायक घटना आंबेगाव पठार भागात घडली आहे. खून करून पसार झालेल्या आरोपीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली आहे. धैर्यशील उर्फ सचिन बळीराम मोरे (२३, रा. तीन हत्ती चौक, आंबेगाव पठार) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. तर, खून झालेल्या तरुणाचे नाव आर्यन उर्फ निखील अशोक सावळे (१९) आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी धैर्यशील आणि आर्यन यांच्यात पूर्वीपासून ओळख होती. ११ जुलै रोजी त्यांच्यात किरकोळ वाद झाला होता. त्यावेळी आर्यनने धैर्यशीलच्या कानाखाली मारले होते. त्याच रागातून आरोपीने आर्यनवर लोखंडी धारदार हत्याराने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत आर्यनला रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. खून झाल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपी धैर्यशील मोरे याचा शोध घेतला. त्यानुसार, आंबेगाव पठार येथील चिंतामणी शाळेसमोरून आरोपीचा पाठलाग करून त्याला अटक करण्यात आली. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, 'कानशिलात मारल्याचा राग मनात धरला होता,' असे त्याने सांगितले.

## पुण्यात दाबेली विक्रेत्या तरुणावर चाकूने हल्ला ; सपासप वार करुन केला खून

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारी वाढली आहे. दररोज वेगवेगळ्या भागातून खून, लुटमार, दरोडे, मारामाऱ्या यासारख्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता पर्वती दर्शन परिसरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पर्वती दर्शन भागात कच्छी दाबेली विक्रेत्या तरुणावर हल्ला केला आहे. तरुणाच्या गळ्यावर चाकूने वार करुन खून केला आहे. ही घटना सोमवारी सकाळी घडली आहे.

याप्रकरणी पोलिसांनी पसार झालेल्या आरोपीला अटक केली. दानिश नजरहसन सिद्धिकी (वय २५, रा. पर्वती दर्शन) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी दिनेश प्रभाकर क्षिरसागर (वय ४०, रा. तळेगाव दाभाडे) याच्यावर पर्वती पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. याबाबत दानिश याची वहिनी मोनी सिद्धीकी यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, दानिश हा त्याचा भाऊ आसिफ, त्याची पत्नीसह गेल्या काही वर्षांपासून पर्वती दर्शन भागात राहायला आहे. तो पर्वती दर्शन भागात हातगाडीवर कच्छी दाबेली विक्री करतो. सिद्धीकी कुटुंबीय मूळचे उत्तर प्रदेशातील आहे. पर्वती दर्शन यंग सर्कल जवळ दानिश याचे घर आहे. सोमवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारासत दानिश याच्या घराचा दरवाजा उघडा होता. तेव्हा दिनेश क्षिरसागर हा त्यांच्या घरात शिरला. त्याने वाद घातला. तेव्हा दानिश व दिनेश यांच्यात वाद झाला. दानिशने त्याला पकडले. दोघांमध्ये झटापट झाली. त्यात दिनेशने चाकूने दानिशच्या गळ्यावर वार केला. दानिश रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.

गंभीर जखमी झालेल्या दानिशला तातडीने रहिवाशांनी खासगी रुग्णालयात दाखल केले. पसार झालेल्या दिनेशला रहिवाशांनी पकडले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. ताब्यात घेतलेल्या दिनेशकडे पोलिसांनी चौकशी केली. प्राथमिक चौकशीत तो मनोरुग्ण असल्याचे दिसून आले आहे. दानिशचा खून का केला, यामागचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती पर्वती दर्शन पोलिसांनी दिली.

दारू पिऊन त्रास देणाऱ्या मुलाचा खून

दारू पिऊन त्रास देणाऱ्या मुलाचा वडिलांनी गमजाने गळा आवळून त्याचा खून केल्याची घटना फुरसुंगीतील कलवा वस्ती येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सुरेश बाबुराव जमदाडे (वय ५९) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याघटनेत प्रशांत सुरेश जमदाडे (वय ३५) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी फुरसूंगी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार दोन दिवसांपुर्वी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास घडला आहे.